विद्यापीठ अनुदान आयोग
पुरस्कृत लघु संशोधन प्रकल्पासाठी सादर केलेला शोधप्रबंध

# "रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती"


**संशोधक**

श्री. दगडू अर्जून जगताप
ग्रंथपाल,
सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ
मंडणगड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मंडणगड, जि. रत्नागिरी.- 415 203.


**कालावधी दि 17-10-2012 ते 16-10-2014**

# मनोगत

मानवी जीवनात व्यक्तीचा ग्रंथालयाशी प्रथम संबंध येत असेल तर तो शालेय जीवनात येतो. म्हणजेच शालेय ग्रंथालये ही मानवी जीवनातील ग्रंथालय क्षेत्रातील पहिला टप्पा होय. त्यानंतर माध्यमिक ग्रंथालये व पुढे महाविद्यालयीन ग्रंथालये येतात. आज आपण ग्रंथालय, ग्रंथालयशास्त्र ते माहिती, माहितीशास्त्र या संकल्पनेच्या निर्मितीपासून माहीतीचा परीस्फोट ते डिजिटल साहित्याचा पूर या संकल्पनेपर्यंत येवून पोहचलो आहोत. माहितीच्या परिस्फोटात्मक स्थितीत पूर्वीची ग्रंथालये, माहितीकेंद्र म्हणून नावारुपास येत आहेत. यापुढील समाज हा माहितीप्रधान समाज म्हणून ओळखला जात आहे.

हीच गोष्ट लक्षात घेवून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत सांस्कृतिक खात्याने ऑक्टोबर 1985 मध्ये प्रा. डी.पी.चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली देशातील ग्रंथालय शास्त्रातील तज्ञ व इतर विशेषज्ञ यांची एक समिती स्थापन केली व देशातील ग्रंथालये व माहितीव्यवस्था याविषयीच्या धोरणाचा मसुदा तयार करण्याची कामगिरी सदर समितीकडे सोपविण्यात आली या समितीने धोरणाचा मसुदा दहा प्रकरणांमध्ये 1986 साली सरकारला सादर केला त्यामध्ये ग्रंथनिर्मिती बरोबरच ग्रंथालयांची स्थिती सुधारण्याबाबतही विचार करण्यात आलेले आहेत. यासाठी ग्रंथालय विकासाबाबत देशव्यापी मोहिम हाती घेण्यात यावी. सर्व शैक्षणिक संस्थामधून ग्रंथालयाची पुरेशी सुविधा असावी असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

प्रत्यक्षात या गोष्टीचा विचार केला तर आजही चिंतनीय अवस्था दिसून येत आहे. आज अनेक महाविद्यालयीन ग्रंथालयाचा विचार केला तरीही ज्या पध्दतीने ग्रंथालयांचा विकास व्हायला हवा होता तेवढ्या प्रमाणात विकास झालेला दिसून येत नाही. NAAC च्या मानांकनासाठी थोड्याफार प्रमाणात ग्रंथालयांचा दर्जा सुधारत चालला असला तरीही अपेक्षित विकास साधला गेलेला नाही. युजीसी कडून अनुदान प्राप्त होत असल्यामुळे महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या स्वतंत्र ईमारती बांधल्या गेल्या परंतु अंतर्गत ग्रंथालयीन सेवा सुविधा बाबत काय स्थिती आहे. याचाच एक भाग म्हणून वाचकांना चांगल्या सेवा देण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे का? हे पाहण्यासाठी संशोधनाकाने हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

दिनांक -

संशोधक

स्थळ - मंडणगड.

श्री. दगडू अर्जून जगताप

# ऋणनिर्देश

'रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती' या विषयावर संशोधन कार्य करत असताना अनेक व्यक्ती, संस्था, हितचिंतक या सर्वाचे मोलाचे सहकार्य लाभले. या अनुषंगाने त्या सर्वाचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे प्रथम कर्तव्य समजतो.

सदर संशोधन कार्याकरीता विद्यापीठ अनुदान आयोग संशोधन विभागाच्या माध्यमातून संशोधकाला या लघुसंशोधन प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य मिळाले त्यामुळेच हा संशोधन प्रकल्प, संशोधक विनासायास पूर्ण करु शकला यासाठी या विभागाचे डायरेक्टर सहित विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

हा संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. मंडणगड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य मा. आदिनाथ सांगले यांनी या संशोधन कार्याकरीता आवश्यक असलेले सर्वतोपरी सहकार्य केले. तसेच महाविद्यालयाचे कर्मचारी श्री. नितीन मेहता व माझे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वाचे सहकार्य लाभले, या सर्वाचे मी मनःपूर्वक आभारी आहे.

सदर लघुसंशोधन प्रकल्पासाठी माहिती संकलन ही फार महत्वाची बाब होती. याकामी रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व ग्रंथपाल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी वेळेत प्रश्नावली भरून पाठविल्यामूळेच मी माझे हे संशोधन वेळेत पूर्ण करु शकलो त्यामूळे त्या सर्वाचा मी ऋणी आहे.

सदर संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी माझ्या घरातील विशेषतः पत्नी व मुले याचे सहकार्य लाभले याचा उल्लेख करणे मी उचित समजतो.

या शिवाय हा संशोधन प्रकल्प पूर्ण करताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य लाभले व मी येथे उल्लेख करु शकलो नसेल तर त्या सर्वाचे मनःपूर्वक आभार.

दिनांक -  
स्थळ - मंडणगड.

संशोधक  
श्री. दगडू अर्जून जगताप

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | | **प्रकरण 1 (प्रास्ताविक व संशोधन आराखडा)** | 01-21 |
| | 1.1 | प्रस्तावना | 02 |
| | 1.2 | ग्रंथालय संकल्पना व संशोधन विषयाची निवड | 03 |
| | 1.3 | संशोधनाची आवश्यकता व महत्व | 06 |
| | 1.4 | संशोधनाची उद्दिष्टे | 07 |
| | 1.5 | संशोधनाची गृहितके | 08 |
| | 1.6 | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | 08 |
| | 1.7 | संशोधनाची पध्दती व माहिती संकलन | 09 |
| | 1.7.1 | वर्णनात्मक संशोधन पध्दती | 10 |
| | 1.8 | संशोधनाची तंत्रे | 11 |
| | 1.9 | संशोधनाची साधने | 11 |
| | 1.9.1 | प्रश्नावली | 11 |
| | 1.10 | साहित्यशोध समालोचन | 12 |
| | 1.10.1 | साहित्यशोधाचे महत्व | 12 |
| | 1.10.2 | साहित्यशोध आराखडा | 13 |
| | 1.10.3 | संशोधन पध्दती, तंत्रे व साधने संबंधित साहित्याचे समालोचन | 13 |
| | 1.11 | समारोप | 21 |
| 2 | | **दृष्टिक्षेपात रत्नागिरी जिल्हा** | 22-27 |
| | 2.1 | प्रस्तावना | 23 |
| | 2.2 | रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी | 23 |
| | 2.3 | रत्नागिरी जिल्ह्याची ऐतिहासिक माहिती | 24 |
| | 2.4 | रत्नागिरी जिल्ह्याची सांस्कृतिक माहिती | 25 |
| | 2.5 | रत्नागिरी जिल्ह्याची शैक्षणिक माहिती | 26 |
| | 2.6 | समारोप | 27 |
| 3 | | **महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाशी संबंधित घटक** | 28-32 |
| 4 | | **संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण** | 33-64 |
| | 4.1 | प्रस्तावना | 34 |
| | 4.1 | प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण | 34 |
| | 4.2 | स्थापना वर्षनिहाय महाविदयालयांचे वर्गीकरण | 35 |
| | 4.3 | महाविदयालयांचे सुरु असलेल्या अभ्यासक्रमनिहाय वर्गीकरण | 37 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 4.4 | महाविद्यालयाची 2(f) व 12(B)साठीची मान्यता | 38 |
| | 4.5 | महाविद्यालयाच्या नॅक मुल्यांकनाचे विश्लेषण | 39 |
| | 4.6 | ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत | 40 |
| | 4.7 | ग्रंथालयामधील फर्निचर | 41 |
| | 4.8 | ग्रंथालयातील कर्मचारी | 42 |
| | 4.9 | ग्रंथालय कमिटी | 44 |
| | 4.10 | ग्रंथालयातील वाचकवर्ग | 44 |
| | 4.11 | ग्रंथालयाची वेळ | 45 |
| | 4.12 | ग्रंथालयातील क्रमिक ग्रंथसंख्या | 46 |
| | 4.13 | ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथसंख्या | 47 |
| | 4.14 | ग्रंथालयातील नियतकालिके | 48 |
| | 4.15 | ग्रंथालयातील उपलब्ध सीडी | 50 |
| | 4.16 | ग्रंथालयातील उपलब्ध ईबुक्स | 51 |
| | 4.17 | ग्रंथालयातील उपलब्ध दैनिके | 52 |
| | 4.18 | वाचकांना आकर्षित करण्यासाठी योजना | 53 |
| | 4.19 | ग्रंथालय वर्गीकरण पद्धत | 54 |
| | 4.20 | ग्रंथालय तालिकीकरण | 54 |
| | 4.21 | ग्रंथालयातील विविध कक्ष | 55 |
| | 4.22 | ग्रंथालयाचे संगणकीकरण स्थिती | 56 |
| | 4.23 | ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा | 57 |
| | 4.24 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक, प्रिंटर, स्कॅनर इत्यादी | 58 |
| | 4.25 | ग्रंथालयामधील संगणकीकरण केलेले विभाग | 60 |
| | 4.26 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध आज्ञावली | 61 |
| | 4.27 | ग्रंथालय Inflibnet शी जोडले आहे का? | 62 |
| | 4.28 | ग्रंथालय बेबसाईट | 63 |
| | 4.29 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध नेट ब्राउझर | 63 |
| | 4.30 | भविष्यकालीन योजना | 63 |
| 5 | | ग्रंथालयाच्या संगणकीकरणामध्ये आढळलेल्या समस्या व निष्कर्ष | 65-70 |
| 6 | | उपाययोजना / शिफारस | 71-73 |
| 7 | | संदर्भसूची | 74-77 |
| 8 | | परीशिष्ट | 78-85 |
| | | परीशिष्ट 1 - प्रश्नावली | 79 |
| | | परीशिष्ट 2 - रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयांची सुची | 86 |
| | | परीशिष्ट 3 - रत्नागिरी जिल्ह्याचा नकाशा | 87 |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 4.1 | प्रश्नावलीला मिळालेला प्रतिसाद | 34 |
| 4.2 | स्थापना वर्षनिहाय महाविद्यालयांचे वर्गीकरण | 36 |
| 4.3 | महाविद्यालयामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम | 37 |
| 4.4 | महाविद्यालयांची 2(f) व 12(B) साठी अनुदानास पात्रता | 38 |
| 4.5 | महाविद्यालयांच्या नॅक मुल्यांकनाचे विश्लेषण | 39 |
| 4.6 | ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत | 40 |
| 4.7 | ग्रंथालयात उपलब्ध फर्निचर | 41 |
| 4.8 | ग्रंथालयातील सेवक वर्ग | 42 |
| 4.9 | ग्रंथालयातील वाचक वर्ग | 45 |
| 4.10 | ग्रंथालयातील उपलब्ध क्रमिक पुस्तक | 46 |
| 4.11 | ग्रंथालयातील उपलब्ध संदर्भग्रंथ | 48 |
| 4.12 | ग्रंथालयातील उपलब्ध नियतकालिके | 48 |
| 4.13 | ग्रंथालयातील उपलब्ध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रिय नियतकालिके | 49 |
| 4.14 | ग्रंथालयातील उपलब्ध सीडी | 50 |
| 4.15 | ग्रंथालयातील उपलब्ध ईबुक्स | 51 |
| 4.16 | ग्रंथालयातील उपलब्ध दैनिके | 52 |
| 4.17 | वाचकांना आकर्षित करण्यासाठीच्या योजना | 53 |
| 4.18 | ग्रंथालयाचे वर्गीकरण | 54 |
| 4.19 | ग्रंथालयाचे तालिकीकरण | 54 |
| 4.20 | ग्रंथालयातील उपलब्ध कक्ष | 55 |
| 4.21 | ग्रंथालयाची संगणकीकरण स्थिती | 56 |
| 4.22 | ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा | 57 |
| 4.23 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक, प्रिंटर इत्यादी | 59 |
| 4.24 | ग्रंथालयामध्ये संगणकीकरण केलेले विभाग | 60 |
| 4.25 | ग्रंथालयामधील उपलब्ध आज्ञावली | 61 |
| 4.26 | ग्रंथालयाची Inflibnet शी जोडणी | 62 |
| 4.27 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध नेट ब्राऊझर | 63 |

# आलेख / आकृती सूची


| आलेख / आकृती क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 4.1 | संशोधनकर्त्याने पाठविलेल्या प्रश्नावलीला मिळालेला प्रतिसाद | 35 |
| 4.2 | महाविद्यालयांची स्थापना वर्ष | 36 |
| 4.3 | महाविदयालयाची 2(f) व 12(B) साठी अनुदानास मान्यता | 38 |
| 4.4 | ग्रंथालयात उपलब्ध फर्निचर | 41 |
| 4.5 | ग्रंथालयात कर्मचारी वर्ग | 43 |
| 4.6 | ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथसंख्या | 47 |
| 4.7 | राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची उपलब्धता | 49 |
| 4.8 | वाचकांना आकर्षित करण्यासाठीच्या योजना | 53 |
| 4.9 | ग्रंथालय संगणकीकरणाची स्थिती | 57 |
| 4.10 | ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा | 58 |
| 4.11 | ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक प्रिंटर इत्यादी | 59 |
| 4.12 | ग्रंथालयामधील उपलब्ध आज्ञावली | 62 |

# प्रकरण 1
# प्रास्ताविक व संशोधन आराखडा

# प्रकरण 1
# प्रास्ताविक व संशोधन आराखडा

## 1.1 प्रस्तावना

पूर्वीच्या काळी ज्ञान मौखिक स्वरुपात जतन करीत. वेद, पूराणे मखोद्गत असत. एका पिढीकडून दूसऱ्या पिढीकडे पाठांतर करुन ज्ञान हस्तांतरीत होई. नंतर ज्ञानसंवर्धनासाठी ताडपत्रे, भूजपत्रे, वापरत. त्यावर मजकूर कोरून ठेवीत. काळाच्या ओघात कागदाचा शोध लागला आणि हस्तलिखितांची निर्मिती झाली.

प्राचीन कालापासूनच भारत देशाला ज्ञानाचा व संस्कृतीचा संपन्न वारसा लाभलेला आहे. प्राचीन तसेच मध्ययुगीन काळातही ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या काही धार्मिक व सांस्कृतिक संस्था होत्या आणि त्यासोबत अनेक ठिकाणी चांगली ग्रंथालये अस्तित्वात होती.

प्राचीन भारतात अयोध्या, काशी, कांची, उदंतपुरी, गुणशीला, नालंदा अशी अनेक विद्यापीठे अस्तित्वात होती. या विद्यापीठांतून हिंदू, जैन व बौध्द धर्माचार्यानी असंख्य हस्तलिखितांचे जतन केले होते व तेथे वादविवाद, परीसंवाद, चर्चा होत असत. (1)

मध्ययुगात अनेक मोगल शासकांनीही आपल्या राज्यात किताबखाने सांभाळले होते. तामिळनाडू येथील तंजावरचे सरस्वती महाल ग्रंथालय, पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथालय इत्यादी भारतात अस्तित्वात होती.

16 व्या शतकात खिश्चन मिशनऱ्यांनी लेखन, वाचनाचा प्रसार केला, तसेच मुद्रणकला अस्तित्वात आल्यानंतर ग्रंथछपाई, ग्रंथसंग्रह करण्याकडे कल वाढत गेला. ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट लायब्ररी (बडोदा), पुणे येथील सुविख्यात भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे ग्रंथालय यासारख्या नावाजलेल्या ग्रंथालयांची सुरुवात इंग्रजी काळातच झाली.

---

1. मराठे, ना,बा, 1979, भारतीय ग्रंथालयांचा इतिहास, मुंबई, अभिनव प्रकाशन.पृ.6.

ब्रिटीशांनी परंपरागत शिक्षण व्यवस्थेत परीवर्तन घडवून आणले. छपाई व पुस्तक निर्मितीस प्रोत्साहन दिले.

या पार्श्वभूमीवर 1947 साली भारत देशाला स्वातंत्र मिळाले. भारतामध्ये ग्रंथालय विकासाचे योजनाबध्द प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच सुरु झाले. कलकत्ता येथे राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना झाली. भारतात काही राज्यात ग्रंथालय कायदे अस्तित्वात आले तसेच पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाल्या. या विविध गोष्टीमुळे देशभर ग्रंथालये आणि माहितीकेंद्रे यांच्या विकासाला चालना मिळाली.

## 1.2 ग्रंथालम संकल्पना व संशोधन विषयाची निवड

'Library' हा शब्द लॅटीन भाषेतील 'liber' या शब्दापासून तयार झालेला असून 'Library' या शब्दाचा अर्थ New Encyclopedia Britanica मध्ये 'Collection of Book' असा दिला आहे. (2)

'ग्रंथालय' या संज्ञेचा अर्थात सातत्याने परीवर्तन होत गेले आहे. सुरुवातीला 'पुस्तक लिहिण्याचे ठिकाण म्हणजे ग्रंथालय' त्यानंतर 'पुस्तकांचा संग्रह करण्याचे ठिकाण' या अर्थाने 'ग्रंथालय' हा शब्द वापरला जावू लागला. यामध्ये ग्रंथसंग्रहाचा वापर करण्याबाबतचा उल्लेख क्कचितच आढळतो. मात्र Oxford English Dictionary, Vol.3, 1989 मध्ये 'ग्रंथालय' म्हणजे "A building, room or set of rooms containing a collection of books for the use of public or some particular portian on it or of the members of some society or like a public institution or establishment charged with the care of collection of books accessible to those who require using them." असे म्हटले आहे. (3)

---

2. New Encyclopedia Britanica, 1977, Chicago, Encyclopedia Britannica, INC, Vol.10, p.862.

3. Oxford English Dictionary, 1989, Oxford Clarendon press, Vol. 3, p.888.

डॉ. रंगनाथन यांच्या मतानुसार, "ग्रंथालय म्हणजे वाचक, ग्रंथपाल व ग्रंथ यांची एकत्रित येण्याची जागा होय." (4)

थोडक्यात संग्रहीत पुस्तकाची काळजी घेणारी आणि ज्यास गरज असेल त्या (वाचकास) पुस्तके सहजतेने उपलब्ध करुन देण्याचे कर्तव्य बजावणारी सार्वजनिक संस्था म्हणजे ग्रंथालय होय.

अशा या ग्रंथालयाचे पुढे विविध प्रकार पडले गेले. राष्ट्रीय ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय व विशेष ग्रंथालय. यापैकी शैक्षणिक संस्थामधील ग्रंथालयांचा समावेश शैक्षणिक ग्रंथालयात होतो. यामध्ये पुन्हा शालेय ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय व विद्यापीठीय ग्रंथालय असे प्रकार पडतात.

मानवी जीवनात व्यक्तीचा ग्रंथालयाशी प्रथम संबंध येत असेल तर तो शालेय जीवनात येतो. म्हणजेच शालेय ग्रंथालये ही मानवी जीवनातील ग्रंथालय क्षेत्रातील पहिला टप्पा होय.

आज आपण माहीती या संकल्पनेच्या निर्मितीपासून माहीतीचा परीस्फोट ते डिजिटल साहित्याचा पूर या संकल्पनेपर्यत येवून पोहचलो आहोत. युनेस्कोच्या आंतरराष्ट्रिय परीषदेने प्रकाशित केलेल्या 'विकासासाठी वैज्ञानिक आणि तांत्रिक माहितीचा उपयोग, युनिसिस्ट 1979', या प्रलेखात माहितीची व्याख्या पुढील प्रमाणे दिलेली आहे. "चिन्हांकन युक्त भाषेत विदित केलेले शास्त्रीय आणि तांत्रिक स्वरुपाचे ज्ञान म्हणजे माहिती. ती आकडेवारीच्या, गद्य तपशिलाच्या किंवा चित्राच्या स्वरुपात असू शकते. ती कागदावर मुद्रित, सूक्ष्मपटावर छायाचित्रित किंवा संगणकाच्या फ्लॉपीवर नोंदीत स्वरुपात असू शकते." (5) उपरोक्त व्याख्येनुसार विभिन्न स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीच्या परिस्फोटात्मक स्थितीत पूर्वीची ग्रंथालये, माहितीकेंद्र म्हणून नावारुपास येत आहेत. यापुढील समाज हा माहितीप्रधान समाज म्हणून ओळखला जात आहे.

---

4. रंगनाथन, एस, आर, 1933, *ग्रंथालय शास्त्राचा ओनामा*, पुणे, इन्टरनॅशनल बुक सर्व्हिस, पृ.22.

5. Kemp, D, Alasdair, 1979, Current Awareness Services, London, Clive Bingley ,p.106.

हीच गोष्ट लक्षात घेवून भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयांतर्गत सांस्कृतिक खात्याने ऑक्टोबर 1985 मध्ये प्रा. डी.पी.चटोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली देशातील ग्रंथालय शास्त्रातील तज्ञ व इतर विशेषज्ञ यांची एक समिती स्थापन केली व देशातील ग्रंथालये व माहितीव्यवस्था याविषयीच्या धोरणाचा मसुदा तयार करण्याची कामगिरी सदर समितीकडे सोपविण्यात आली या समितीने धोरणाचा मसुदा दहा प्रकरणांमध्ये 1986 साली सरकारला सादर केला त्यामध्ये ग्रंथनिर्मिती बरोबरच ग्रंथालयांची स्थिती सुधारण्याबाबतही विचार करण्यात आलेले आहेत. यासाठी ग्रंथालय विकासाबाबत देशव्यापी मोहिम हाती घेण्यात यावी. सर्व शैक्षणिक संस्थामधून ग्रंथालयाची सुविधा असावी असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.(6)

प्रत्यक्षात या गोष्टीचा विचार केला तर खूप चिंतनीय अवस्था दिसून येत आहे. एवढी प्रचंड प्रमाणात, विविध साहित्यप्रकारात माहिती आपणासमोर उपलब्ध असताना आपल्याला हवी असलेली माहिति योग्य वेळी शोधून सापडते का? मानवी जीवनात माहितीला एवढे महत्वाचे स्थान असून विद्यार्थी जीवनात जेवढी माहिती मिळविण्याची आवड़ निर्माण व्हायला हवी तेवढी निर्माण झालेली दिसून येते का? ग्रंथालयाचा वापर विद्यार्थी स्वयं अध्ययनासाठी करतात का? याची उत्तरे नकारात्मक द्यावी लागतात.

याची अनेक कारणे दिसून येतात त्यापैकी एक म्हणजे वाचकाची ग्रंथालयाबल असणारी अनभिज्ञता होय. ग्रंथालयाची देवघेव पध्दती, ग्रंथालयाचे नियम, ग्रंथालयाचे सभासद होण्याची पध्दती, ग्रंथालयात कोणकोणती माहिती उपलब्ध आहे? माहितीचे स्त्रोत कोणकोणते आहेत? माहितीचा शोध कसा घ्यावा? संदर्भग्रंथ कसे हाताळावेत? संदर्भग्रंथातील माहितीची रचना कशी असते? इंटरनेटच्या साहय्याने माहिती कशी शोधावी? इत्यादी अनेक तांत्रिक बाबींची माहिती वाचकाला नसते.

---

6. National Policy on Library & Information system - A presentation, Ministry of Human Resource Development, Dept of Culture, New Delhi, 1986.

यासाठी वास्तविक पाहता उपभोक्ता / वाचक प्रशिक्षण, उपभोक्ता उद्‌बोधन, ग्रंथालय परीचय, वाचकांना साहाय्य, वाचकांना सूचना, वाचकांना मार्गदर्शन, नवागत वाचकाला ग्रंथालयाची ओळख इत्यादी कार्यक्रम विद्यापीठ वा संशोधन ग्रंथालयात हाती घेतले जातात. परंतू महाविद्यालयीन ग्रंथालयात याबाबत काय स्थिती आहे या सर्व सेवा देण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे आवश्यक आहे व त्यानंतर आपण अनेक वाचकाभिमुख सेवा देवू शकतो या संबंधित विचार करताना रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने हा विषय लघु संशोधन प्रकल्पासाठी हाती घेतला आहे.

## 1.3 संशोधनाची आवश्यकता / महत्व

ग्रंथालयातील वाचन साहित्याची प्रचंड वाढ, माहितीचा विस्फोट, तसेच प्रचंड प्रमाणातील उपलब्ध वाचन साहित्य हाताळणे व तयाचा वापर करणे हे आज ग्रंथालय कर्मचारी व वाचकांच्या अवाक्याबाहेरची गोष्ट बनली आहे. माहितीतंत्रज्ञानात रोज नवनवीन तंत्राचा विकास, ग्रंथालय संगणकीकरणामुळे ग्रंथालय कर्मचारी व वाचक यांचा माहिती मिळविण्याचा वेळ वाचतो. तसेच माहिती देवाण-घेवाण यामध्ये सुलभता व गुणवत्तापूर्ण सेवा देता येते. देशाचा विकासातही ग्रंथालयांचे योगदान असते कारण आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानच विकासाचे साधन बनले असून ग्रंथालय हे ज्ञानाचे मुख्य स्त्रोत आहे.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी भारत सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे महत्व ओळखून विद्यापीठ, महाविद्यालये व विविध प्रकारच्या शैक्षणिक संशोधन संस्थाना अर्थसहाय्य देवू केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने संगणक खरेदी, पुस्तक खरेदी, प्रयोगशाळांची निर्मिती, ईमारत बांधकाम आदी करीता वित्त सहाय्य पुरविले जाते.

उच्च शिक्षणातील ग्रंथालय सुधारणेचा एक भाग म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने सन 1986 मध्ये गुजरात राज्यातील अहमदाबात या ठिकाणी राष्ट्रिय माहितीचे जाळे (INFLIBNET - Information and Library Network ) याची स्थापना केली आहे. या प्रकल्प अंतर्गत देशातील सर्व विद्यापीठे, महाविदयालये व संशोधन संस्था यांच्यामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जोडली जाणार असून याव्दारे ग्रंथालयातील माहितीची देवाण-घेवाण होणार आहे. हा प्रकल्प एक महत्वपूर्ण असून याकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाने ग्रंथालयाकरीता सोल (SOUL) ही संगणक प्रणाली विकसीत केली आहे. संशोधनाचा मुख्य हेतू हा आहे की विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या प्रकल्पांच्या दृष्टिने किती शैक्षणिक संस्थानी ग्रंथालय संगणकीकरणाच्या दिशेने पाऊल टाकले आहे याचा शोध घेणे.

## 1.4 संशोधनाची उ- ष्टे -

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाचा "रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती" हा विषय निश्चित करताना संशोधकाने पुढील उ- ष्टे नजरेसमारे ठेवलेली होती.

1) रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती याची माहिती करुन घेणे.
2) रत्नागिरी जिल्ह्यातील किती महाविद्यालयीन ग्रंथालयांनी संगणकीरणाच्या कामाला सुरुवात केली आहे याची माहिती करुन घेणे.
3) ग्रंथालयामध्ये संगणकीकरणासाठी कोणत्या प्रणालीचा वापर करत आहेत याची माहिती करुन घेणे.
4) ग्रंथालयामध्ये संगणकीकरण करताना येणाऱ्या समस्या जाणून घेणे.

## 1.5 संशोधनाची गृहीतके -

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी विषय निश्चिती करताना संशोधकाने खालील गृहीतके निश्चित केली आहेत.

1) महाविद्यालयीन ग्रंथालयात विविध प्रकारचे वाचन साहित्य उपलब्ध असते.
2) महाविद्यालयीन ग्रंथालयाने संगणकीकरणाच्या कामाला सुरुवात केलेली असेल.
3) ग्रंथालय संगणकीकरणासाठी ग्रंथालयीन आज्ञावली खरेदी करण्यात आलेली असेल.
4) तसेच ग्रंथालयाच्या विकासाबाबत प्राचार्य, महाविद्यालयाचे व्यवस्थापन मंडळ, महाविद्यालयातील कर्मचारी यांच्यात उदासीनता दिसते.

## 1.6 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा म्हणजे रत्नागिरी. रत्नागिरी जिल्ह्यात कला, वाणिज्य व विज्ञान अनुदानित महाविद्यालये एकुण 13 आहेत.

संशोधकाने "रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती" हा विषय निश्चित केल्यावर पुढील प्रमाणे व्याप्ती निश्चित केलेली आहे.

1) संशोधनासाठी फक्त रत्नागिरी जिल्ह्यातील अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन ग्रंथालयांचाच अभ्यास करण्याचे संशोधकाने निश्चित केलेले आहे.

2) सदर संशोधनात रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयातील संगणकीकरणाची सद्यस्थितीचाच अभ्यास केला जाणार आहे.
3) सदर संशोधनासाठी सन 2010-11 ते 2012-13 या गेल्या तीन वर्षातील माहिती संकलित केली जाणार आहे.

अशा व्याप्ती अंतर्गत येणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील 13 महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या सद्यःस्थितीचा विचार संशोधकाने केलेला आहे.

## 1.7 संशोधन पध्दती व माहिती संकलन

ग्रंथालयशास्त्रातील संशोधनाचे स्वरुप हे सामाजिक शास्त्रातील संशोधनाप्रमाणेच आहे. ग्रंथालय शास्त्रातील संशोधनाबाबत जेव्हा विचार केला जातो तेव्हा जिज्ञासेमुळे कमी व व्यावहारीक आवश्यकतेमुळे जास्त संशोधनाची गरज आहे असे लक्षात येते. प्रत्येक ज्ञानशाखेची वेगळी वैशिष्ट्ये असतात. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र म्हणून मानले जाते. 'इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स' या संस्थेने सुध्दा त्याला सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रात वापरण्यात येणाऱ्या संशोधनाच्या पध्दती, तंत्रे व साधने याचाच वापर ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधनासाठी करण्यात येतो.

'संशोधन' याला इंग्रजीत Research हा शब्द आहे. त्याचा अर्थ पुनः पुन्हा शोध घेणे असा आहे. संशोधनाच्या व्याख्या विविध मान्यवरांनी केलेल्या आहेत. चार्ल्स बुशा व स्टीफन हार्टर यांच्या मते, "संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध" होय.(7)

वेबस्टरच्या शब्दकोशानुसार, "संशोधन म्हणजे ज्ञानाच्या एखाद्या शाखेत नवीन तथ्ये व तत्वे शोधण्यासाठी किंवा जूनी तत्वे किंवा तथ्ये तपासण्यासाठी काळजीपूर्वक, पध्दतशीर व नेटाने केलेला अभ्यास होय."(8)

व्यक्तिच्या जीवनाशी निगडीत अनेक शास्त्रे आहेत. नवीन माहितीचा शोध घेण्यासाठी व्यक्तीची धडपड सतत चालू असते. अगदी मानवी जीवनाच्या सुरुवातीच्या काळापासूनचा जर इतिहास पाहिला तरीही आपल्याला या गोष्टीची सत्यता पडताळता येते.

कार्ल पियर्सन यांच्या कथनानुसार "सत्यप्राप्तीसाठी कोणताही लघू मार्ग नाही विश्वाचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी संशोधन पध्दती शिवाय दूसरा मार्ग नाही" असे म्हटले आहे.(9)

---

7. Busha, Charles H and Stephen P Harter, 1980, *Research Methods in Lbrarianship : Techniques and Interpretation*, New York, Academic Press, p. 3.

8. कुंभोजकर, ग, वि, 1989, *संशोधन पध्दती व संख्या शास्त्र*, कोल्हापूर , फडके प्रकाशन.पृ.19

9. Kothari, C, R, *Research Methodology methods & tecniques*, New Delhi, New age international (p) Ltd. p.152.

## 1.7.1 वर्णनात्मक संशोधन पध्दती -

सद्यस्थितीचा सर्वकष अभ्यास करुन प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन असे म्हणतात.

वर्णनात्मक संशोधन म्हणजे एखाद्या विषयावर केवळ मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन करणे नव्हे, तर वर्णनात्मक संशोधनात संकलित माहितीच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. 1) संबंधित समस्येसंबंधी आजची स्थिती काय आहे? 2) त्यामध्ये निश्चितपणे कोणत्या अडचणी व त्रुटी आहेत? 3) मिळविलेल्या माहितीच्या आधारे विविध तज्ञांची मते घेवून संशोधकाने स्वतः चे ज्ञान वापरुन या समस्येवर उपाय शोधावा. या सर्व गोष्टी वर्णनात्मक संशोधनात अभिप्रेत असतात. सामाजिक शास्त्रामध्ये ह्या पध्दतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे सुध्दा सामाजिक शास्त्र असल्याने या शास्त्रातील बहूतांश संशोधन हे वर्णनात्मक आहे.(10)

व्हिटनी व गोपाल यांनी वर्णनात्मक संशोधनाच्या प्रक्रियेचे निकष दिले आहेत ते पुढीलप्रमाणे होत.

1) संशोधनासाठी योग्य समस्येची निवड झाली पाहिजे.

2) गोळा केलेली माहिती विश्वासार्ह हवी.

3) दोन सारख्या घटनांमध्ये तुलना करताना तुलनेचे सर्वमान्य निकष वापरणे

आवश्यक आहे.

4) भावी संशोधनाकरीता अहवालात मार्गदर्शनपर सूचना कराव्यात.

5) संशोधनाचा उद्देश सुस्पष्ट असावा.

या निकषांचा वापर करुन वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केलेले संशोधन कार्य हे निश्चितच विश्वासाहार्य असते.

---

10. Whitney, F, L, 1948, The Elememts of Research., New York, Prentice Hall. (Quoted in रिसवाडकर, म, रा, 2000, संशोधन : व्याख्या आणि पध्दती, नाशिक, य.च.म.मु.विद्यापीठ, पृ.17-20.)

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्दती उपयुक्त असल्याने संशोधकाने या पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

## 1.8 संशोधनाची तंत्रे

कोणत्याही संशोधनात एकदा अभ्यास विषय निश्चित झाल्यानंतर त्या विषयासंबंधी तथ्ये गोळा करणे आवश्यक असते. तथ्य या शब्दाला इंग्रजीत Fact असे म्हणतात. तथ्य म्हणजे जसे आहे तसे पाहणे किंवा रेखाटने होय. संशोधन कार्याचा आत्मा म्हणजे तथ्य होय. तथ्य संकलन पध्दतीचे ढोबलमनाने दोन प्रकार पडतात 1) एक म्हणजे समस्येच्या अनुरोधाने आपल्याला हवी असलेली माहिती स्वतः जमविणे या पध्दतीने जमवलेल्या माहितीला प्राथमिक माहिती असे म्हणतात. निश्चित हेतू नजरेसमोर ठेवून ही माहिती स्वतः मिळविलेली असते. 2) तथ्य संकलन पध्दतीचा दुसरा प्रकार म्हणजे इतरांनी जमा केलेल्या माहितीवरुन संकलित करण्याचा होय. याला दुय्यम माहिती असे म्हणतात. अशा प्रकारची माहिती मिळविण्यासाठी संशोधनात काही तंत्र व साधने यांचा वापर करावा लागतो.

संशोधकाने "रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन "रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती" हा शोध प्रबंध सादर करताना सर्वेक्षण या तंत्राचा तर प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे.

## 1.9 संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे.

### 1.9.1 प्रश्नावली -

विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधिताकडून त्या समस्येबाबत माहिती मिळविण्याच्या हेतून तयार केलेल्या प्रश्नाच्या मालिकेस प्रश्नावली म्हणतात

प्रश्नावली चे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे बंदिस्त प्रश्नावली व दुसरी मुक्त प्रश्नावली.

बंदिस्त प्रश्नावलीत संभाव्य पर्यायी उत्तरे देवून उत्तरदात्यास त्यापैकी योग्य पर्यायाची निवड करण्यास सांगितले जाते तर मुक्त प्रश्नावलीत उत्तरदात्याला स्वतः च्या शब्दात उत्तर द्यावयाचे स्वातंत्र्य असते.

संशोधन कर्त्याने या संशोधनासाठी मिश्र प्रश्नावलीचा वापर केलेला होता. काही प्रश्न बंदिस्त प्रश्नावली स्वरुपातले तर काही प्रश्न मुक्त प्रश्नावली स्वरुपातले होते.

## 1.10 साहित्य शोध म्हणजे काय ?

साहित्याची वाढ ही अमर्यादित स्वरुपात होत आहे मग तो विषय कोणताही असो. हे साहित्य ग्रंथ, नियतकालिके, पत्रके, विवरण इत्यादी विविध स्वरुपात प्रसिध्द होते. यापैकी पुष्कळशा प्रकाशनात त्याच माहितीचा पुर्नउल्लेख किंवा पुनरावृत्ती झालेली असते. पण हे समजण्यासाठी त्याचे वाचन करणे आवश्यक ठरते.

संशोधकांना माहितीच्या विशाल विश्वात दडलेली माहिती मिळविण्याचे कार्य हे सहज शक्य नसते. विविध प्रकारातील आपल्या विषयाशी संबंधित उपलब्ध माहिती शोधून काढणे यालाच साहित्यशोध म्हणतात.

### 1.10.1 साहित्यशोधाचे महत्व

कोणत्याही विषयातील संशोधन असो, संशोधकाला प्रथम त्या विशिष्ट क्षेत्रातील अद्यावत ज्ञानाव्यतिरिक्त त्या क्षेत्रात अगोदर होवून गेलेल्या कामाचा, उपलब्ध साहित्याचा आणि संशोधनाचा आढावा घेणे अगत्याचे असते. या कामासाठी ग्रंथालयाची अत्यंत जरुरी असते. साहित्यशोध घेतल्याने सुरुवातीपासूनच त्या विषयाची संपुर्ण माहिती कळते. यामुळे अनावश्यक माहितीची पुनरावृत्ती होणार नाही व त्यापुढील लोकोपयोगी संशोधन करता येईल. यासर्वासाठी साहित्यशोध महत्वाचा ठरतो.

### 1.10.2 साहित्यशोध आराखडा

संशोधकाने "रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती" हा संशोधनाचा विषय निश्चित केल्यावर प्रथम ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय, संशोधन पध्दती इत्यादी विविध विषयावर ग्रंथ, नियतकालिके, वेबसाईटच्या आधारे माहितीचा शोध घेण्यात आला. तसेच उपरोक्त विषयाशी संबंधित पुढील संज्ञेखाली (Library Automation, Library Instruction, Guides to Readers, Instructions to user, Library Computeration) माहिती शोधली.

### 1.10.3 संशोधन पध्दती, तंत्रे व साधने संबंधित साहित्याचे समालोचन -

संशोधकाने विषय निश्चित झाल्यानंतर संशोधन पध्दतीशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला त्याचे थोडक्यात विवेचन येथे केले आहे. .

1) एम.एच.गोपाळ यांच्या 'An Introduction research procedure in social science' या ग्रंथातील वर्णनात्मक संशोधन पध्दती, प्रायोगिक संशोधन पध्दती, संशोधनाची तंत्रे याचे केलेले वाचन संशोधनासाठी वापरलेल्या संशोधन पध्दती साठी खूपच मार्गदशक ठरले.(11)

2) गुरुनाथ नाडगोंडे यांच्या 'सामाजिक संशोधन पद्धती' या ग्रंथातील सामाजिक शास्त्रातील संशोधन, तथ्ये व सिध्दांत, संशोधन आराखडा, तथ्य संकलनाच्या

--------------------------------------------------------------------------------------

11. Gopal, M,H, 1970, *A Introduction to Research Procedure in social science,* Bombay, Asis Publication House.

पध्दती, निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत, सामाजिक सर्वेक्षण, संशोधन अहवाल यांचे वाचन करुन संपुर्ण सशोधन कार्यासाठी हा ग्रंथ मार्गदशक ठरला. (12)

3) ग. वि. कुंभोजकर यांच्या 'संशोधन पध्दती व संख्याशास्त्र' या ग्रंथातील संशोधनाची साधने, तंत्रे, गृहीतके, तथ्य संकलनाच्या पध्दती याचे केलेले विवेचन तसेच संख्याशास्त्रीय विश्लेषण हे संशोधकाला प्रस्तुत शोधनिबंधासाठी खूपच उपयुक्त ठरले.(13)

4) चार्लस बुशा व स्टिफन हार्टर यांच्या 'Research Methods in Librarianship: Techniques and Interpretain' या ग्रंथातील संशोधन या संज्ञेचा अर्थ,संशोधन पध्दती, तंत्रे याच्या संदर्भातील माहितीचे वाचन अतिशय उपयुक्त वाटले. (14)

5) पु.ल. भांडारकर यांच्या 'सामाजिक संशोधन पध्दती' या ग्रंथाचे वाचन संशोधकाने केलेले असून सामाजिक संशोधनाच्या तीन पध्दतीचे विस्तृत वाचन संशोधकाने या ग्रंथातून केलेले आहे. (15)

6) Whitney Frederic Lamson यांच्या 'The Elements of Research' या ग्रंथातील वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे वर्णन उपयुक्त वाटले.(16)

---

12. नाडगोंडे, गुरुनाथ, 1986, *सामाजिक संशोधन पध्दती*, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

13. कुंभोजकर, ग,वि, 1989, *संशोधन पध्दती व संख्याशास्त्र*, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

14. Busha, Charles H and Stephen P Harter, Research Methods in Librarianship : Techniques and Interpretaion, New York,Academic Press.

15. भांडारकर, पु, ल, 1987, *सामाजिक संशोधन पध्दती*, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ

16. Whitney, Frederic Lamson., 1948, The Elements of Research, New York, Prentice-Hall.

7) 'Introduction to Research' हा Hillway Tyrus यांचा ग्रंथ होय. या ग्रंथातील संशोधनाचा अर्थ, वर्णनात्मक संशोधन पध्दती, प्रायोगिक पध्दती चे वर्णन उपयुक्त वाटले. (17)

8) 'Methods and Techniques of social Research' या Subramayanya यांच्या ग्रंथातील संशोधनाच्या विविध पध्दती, संशोधनाची तंत्रे व साधने याचे केलेले विवेचन संशोधकाला या संशोधन प्रकल्पासाठी मार्गदर्शक ठरले.(18)

9) Kothari यांचा Research methodology methods & Techniques ह्या ग्रंथातील वर्णनात्मक संशोधन पध्दती, ऐतिहासिक संशोधन पध्दती व प्रायोगिक संशोधन पध्दतीचे केलेले वर्णन संशोधन पध्दती समजावून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरले.(19)

10) संत दु.का. यांच्या 'संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग' ह्या ग्रंथातील संशोधन पध्दती याविषयीचे विवेचन संशोधनकर्त्याला उपयुक्त वाटले.(20)

11) बुवा जी.ए., याच्या 'ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह' या ग्रंथातील डेल्फि तंत्र विषयक सर्व विश्लेषण, डेल्फि तंत्राचा इतिहास, डेल्फि तंत्राचे उपयोजन, डेल्फि तंत्र आणि भविष्यवेध, डेल्फि तंत्राच्या संदर्भात दिलेल्या दहा पायऱ्या, या तंत्राचा वापर करण्यासाठी खूपच मार्गदर्शक ठरल्या.

---

17. Hillway, Tyrus,1964, *Introduction to Research*, Boston, Houghton Mifflin Co, p.148-157.

18. Subramayanya, G, *Methods and techniques of social research*, Bangalore, Sapana book house, p.82-88.
19. Kothari, C, R, *Research Methodology methods and techniques*, New Delhi, New age international.
20. संत, दु, का, 1889, *संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग,* आ.2 री., पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन.

12) शां.गं. महाजन यांचे 'ग्रंथालय संघटन' यामधील भारतातील ग्रंथालयांचा इतिहास, ज्ञानाच्या हस्तांतरणाच्या पध्दती/ वाटचाल, ग्रंथालयांचे प्रकार त्यातील ग्रंथालयाची कार्ये ही माहिती समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरला.

13) 'प्राचीन भारताचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथाचे वाचन संशोधनकर्त्याने जाणीवपूर्वक केलेले असून पूर्वीची शिक्षण पध्दती व सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या पध्दती यांचे वाचन संशोधकाला मार्गदर्शक ठरले.

14) American Library Association(1983) A.L.A. Glossary of Library & Information Science यातील ग्रंथालयाचे विविध प्रकारांमधील शैक्षणिक ग्रंथालय यांचे विवेचन करताना यामधील माहितीचा उपयोग संशोधकाला झाला. (21)

15) मृ.स.हिंदप यांनी 'भारतीय शिक्षण' या अंकातील 'शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयाचे योगदान' या लेखात शिक्षण प्रक्रियेतील ग्रंथालयाच्या महत्वाच्या कार्याचे विवेचन केलेले आहे.(22)

16) अजय वसंतराव गव्हाणे यांनी 'ग्रंथपरीवार' या मासिकातील आपल्या 'शिक्षण आणि ग्रंथालय या एकाच नाण्याच्या दोन बाजू' लेखात ग्रंथालयाचे शिक्षणातील महत्वाच्या भूमिकेचे वर्णन केलेले आहे.(23)

17) रावते शांताराम यांनी 'सामान्य ज्ञानासाठी पदवीधरांचे अवांतर वाचन' या 'भारतीय शिक्षण' यामधील लेखात म्हटलेले आहे की आजच्या युगात

वर्तमानपत्रे, मासिके, वार्षिके इतर नियतकालिकातून, सामान्य ज्ञानावरील पुस्तकातून, रेडीओ, दूरदर्शन वरील विविध वृत्तवाहीनीवर, विविध वार्तापत्रे,

---

21.American Library Association(1983) A.L.A. Glossary of Library & Information Science.Chicago.

22. हिंदप, मृ.सं., जून 1998, शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयाचे योगदान, *भारतीय शिक्षण*, पृ. 222.

23. गव्हाणे, अजय, वसंतराव, एप्रिल मे 1996, शिक्षण आणि ग्रंथालय एकाच नाण्याच्या दोन बाजू, *ग्रंथपरीवार*, पृ.12.

घटना विश्लेषण, चर्चासत्रे, डिस्कव्हरी, नॅशनल जिऑग्राफिक, ॲनिमल प्लनेट या वाहिन्या, विश्वकोश, ज्ञानकोश, इतर संदर्भग्रंथ, इंटरनेट, व्हीडिओ कॉन्फरन्सीज, चँटीग इत्यादी व्दाराही विद्यार्थी आपल्या विषयातील ज्ञान, चालू घडामोडी, इत्यादी माहिती मिळवू शकतात. पण हे शोधण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे आवश्यक आहे. तरच जास्तीत जास्त ई संदर्भ वापरता येतील (24)

18) S. D. Raibole यांच्या Research Methodooty in Library Science या पुस्तकामध्ये त्यांनी संशोधन पद्धती अतिशय विस्तृतपणे समजावून सांगिलत्या आहेत. संशोधकाला संशोधनपध्दती समजावून घेण्यासाठी या पुस्तकांचा खूपच उपयोग झाला. त्यामुळे त्याचा उल्लेख संशोधकाने येथे केलेला आहे. (25)

**19)** प्रस्तुत ग्रंथात संशाोधन करताना वापरवयाच्या पध्दती, त्यावर करावयाची प्रकिया याविषयी माहिती उपलब्ध झाली ✕असून सदर माहिती ही संशोधकास संशाोधन कार्यामध्ये उपयुक्त **अ**शी ठरली ✕आहे.**(26)**

20) प्रस्तुत ग्रंथाचा शौक्षणिक विकाससंदर्भातील सूबध्द ✕आढावा घेण्यासाठी व संशाोधन पध्दतीचे ✕आकलन होण्यासाठी हा ग्रंथ संशोधकास सहायभूत ठरला ✕आहे .(27)

---

24. रावते, शांताराम, जानेवारी 2007, सामान्य ज्ञानासाठी पदवीधरांचे अवांतरवाचन, भारतीय शिक्षण, पृ. 22-23.
*25.* Raibole S. D. , 2013, Research Methodology in Library Science, Kanpur Chandralok Prakasha
*26. संत, दु. का., १९८८, संशोधन पध्दती प्रकिया व अंतरंग , पुणे, लोकसंग्रह मुद्रणालय.*
27. मुळ्ये, रा. शं. आणि उमाठे, वि. तु., १९७७, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर , महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

**21) संशोधकाने या संदर्भग्रंथातून ग्रंथालयामार्फत दिल्या जाणा-या संदर्भ सेवा व संदर्भ साधने कोणती याची माहिती आधिक विस्ताराने समजावून घेण्यासाठी सदर ग्रंथाचा वापर केलेला आहे.(28)**

**22) संशोधकाने या संदर्भ ग्रंथातून ग्रंथालयात संगणकाचा उपयोग करुन अत्याधुनिकीकरणाची प्रकिया कशी केली जाते, स्पइतंतल Automation करिता उपयुक्त ठरेल अशा Software ची माहिती त्याचप्रमाणे CD-ROM व्दारे वाचकांच्या दृष्टिने याबाबत माहितीचे ज्ञान घेण्यासाठी याचा उपयोग केला आहे.(29)**

**23) संशोधकाने रत्नागिरी जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शैक्षणिक विकास व भौगोलिक परिस्थिती आदी बाबत उपयुक्त अशी माहिती मिळविण्यासाठी सदर संदर्भ ग्रंथाचा संशोधन कार्यात वापर करुन लेखन केलेले आहे.(30)**

**24) सदर वेबसाईट ही महाराष्ट्र शासनाची आहे. संशोधकाने Internet च्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाची वेबसाईट वरुन रत्नागिरी जिल्हयासंदर्भातील अद्ययावत शैक्षणिक, लोकसंख्या, संस्था, साक्षरता प्रमाण, रत्नागिरी जिल्हा भौगोलिक स्थान आदी माहिती**

**मिळवण्याकरिता या वेबसाईटचा संशोधकाने आपल्या संशोधन कार्यात वापर केलेला आहे.**(31)

---

28. जोशी, अनंत आणि जोशी, वसंत, १९८०, ग्रंथालय संदर्भ सेवा, पुणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन.
29. Prakash, Chander, 1996, New Technologies and Development in Library and Information Science, Jaipur, Mangal Deep Publication
30. Sharma, K. K. , Pathank, G., Mangnale , V. S., and etc., 2004, Intellectual's Sandharbh Maharashtra, Bhopal, Intellectual Books Bureas, Pp. 314-338.
31. http://www.maharashtra.gov.in/

25) डि.जे. देशमुख यांचे हे पुस्तक डिजिटल लायब्ररी ही संकल्पना समजावून घेण्यासाठी संशोधकाला खूपच मार्गदर्शक ठरले. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाचे डिजिटलायझेशन .(32)

26) J.S.Meshram यांचे Current Tools and Techniques in Lirbary Science हे पुस्तक ग्रंथालय शास्त्रातील नवीन तंत्र समजावून घेण्यासाठी खूपच मार्गदर्शक ठरले. ग्रंथालयशास्त्रातील विविध तंत्रे सहज समजतील अशा भाषेत त्यांनी या ग्रंथात सविस्तर मांडली आहेत. (33)

27) **सदर संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातील देवघेव पध्दती व व्यवस्थापना संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता व सदर विषयाचे आकलन होण्यासाठी संशोधकाने आपल्या संशोधन कार्यात केला आहे.** (34)

**28) शैक्षणिक ग्रंथालयाचे वाढते महत्व लक्षात घेता शैक्षणिक ग्रंथालयाच्या दर्जामध्ये वाढ व्हावी यादृष्टिने ग्रंथालयांची गुणवत्ता मापन करणे का आवश्यक आहे ही माहिती सदर लेखातून प्राप्त होवून मार्गदर्शन ठरली आहे.(35)**

---

32. Deshmukh D. J., 2013, Digital Libraries and Modern Era, Delhi, Ancient Publication. pp.123-129
33. Meshram J.S. , 2014, Current Tools and Techniques in Library Science, Kanpure, Chandralok Prakashan.
34. Trehan, G. L., 1985, College Library Management, New Delhi, Sterling, P. 78.
35. चितळे, चित्रलेखा म., १९९९, 'आधुनिक शैक्षणिक ग्रंथालयातील गुणवत्तेचे मापन', ज्ञानगंगोत्री, पृष्ठ १४-१६ २०

**29) प्रस्तुत सदर संदर्भ ग्रंथाचा वापर ग्रंथालयामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या व्दारे वाचकांना सेवा देण्यास कसा वापर करता येईल हे समजून घेण्यासाठी केला आहे.(36)**

30) Chavan & Aute यांचा Indexing & documentation in Library science हा ग्रंथ ग्रंथालयशास्त्रातील दोन महत्वाच्या संज्ञा समजावून घेण्यासाठी याचा उपयोग संशोधकाला फारच झाला. (37)

31) Dhandur singita यांचा Fundamentals of Library Management हा ग्रंथ ग्रंथालयशास्त्रातील मुलभूत संकल्पना समजावून घेताना उपयोगी पडला. यामधील Central library Catalogue ही संकल्पना समजावून घेताना या पुस्तकाचा उपयोग खूप झाला.(38)

**32) सदर संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातील आधुनिक ग्रंथालय व्यवस्थापनासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता व सदर विषयाचे आकलन होण्यासाठी संशोधकाने आपल्या संशोधन कार्यात केला आहे(39)**

33) संशोधकाने या संदर्भ ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयशास्त्राची मुलभूत तत्वे व नवीन संकल्पना या दोनही गोष्टी समजावून घेण्यासाठी केलेला आहे. (40)

---

36. Halder Sambhu Nath, Jana Sibsankar, 2013, Library And Information Science in Changing Paradigm, New Delhi, Ess Ess Publication
37. Chavan S. P, Aute G, 2012 , Indexing & Documentation in Library Sciene, Delhi, Ancient.
38. Dhandur Singita, 2013, Fundamentals of Library management, Kanpur, arima Prakashan.
39. सिंह प्रमोद कुमार, २०१०, आधुनिक पुस्तकालय सूचना एवं प्रबन्धन, नई दिल्ली, युनिवर्सिटी पब्लिकेशन.
40. Paitankar R.R., 2012, Principales and perspectives in Library science, Delhi, Ancient Publ.

34) Upadhyay Rashmi यांचा Encyclopedia of Digital Library Administration and Management यामधील पहिल्या भागातील ग्रंथालयाच्या कार्यालयीन कामाकाजाची माहिती घेण्यासाठी पहिला भाग मार्गदर्शक ठरला.

## 1.11 समारोप

अशा प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणातील सद्यःस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रस्तृत संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आलेला असल्याने त्यासंबंधीत आवश्यक वाचन साहित्याचा आढावा संशोधकाने घेतलेला आहे. पुढील प्रकरणामध्ये रत्नागिरी जिल्हयाचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

41. Upadhyay Rashmi, 2012 Encyclopedia of Digital Library Adminstration and Management Vol. 1 to 3, New Delhi, Alfa Publ.

# प्रकरण 2

# दृष्टिक्षेपात रत्नागिरी जिल्हा

## प्रकरण 2



# दृष्टिक्षेपात रत्नागिरी जिल्हा



### 2.1 प्रस्तावना

"रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती" हा विषय संशोधन प्रकल्पासाठी निश्चित केला. हा संशोधन प्रकल्प रत्नागिरी जिल्ह्याशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वात प्रथम रत्नागिरी जिल्ह्याची पार्श्वभूमी थोडक्यात समजावून घेवू.

1 मे 1981 रोजी संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होवून रत्नागिरी जिल्हा व सिंधुदुर्ग जिल्हा असे दोन स्वतंत्र जिल्हे निर्माण झाले. एका बाजूला गगनाला गवसणी घालणारे उंच डोंगर तर दुसऱ्या बाजूला पाताळाचा वेध घेणाऱ्या खोल दऱ्या, नारळ पोफळीच्या विस्तीर्ण बागा, डोंगरातून नागमोडी वळणे घेत धावणारे रस्ते, अथांग सागर आणि क्षितिजावर रंगाची उधळण करणारा सुर्यास्त अशा कितीतरी गोष्टीमुळे या जिल्ह्यांत सौंदर्याचा साक्षात्कार होतो.

## 2.2 रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी

रत्नागिरी जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पसरलेला कोकणचा एक प्रमुख भाग आहे. हा जिल्हा 16.30 ते 18.04 उत्तर अक्षांश आणि 73.02 ते 73.52 पूर्व रेखांश या भौगोलिक पट्टयामध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे चिंचोळ्या होत जाणाऱ्या किनारपट्टीत पसरला आहे. जिल्ह्याची उत्तर दक्षिण लांबी 225 कि.मी. असून पूर्व पश्चिम विस्तार सुमारे 64 कि.मी. आहे. जिल्ह्याला 167 लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे.

जिल्ह्याच्या उत्तरेला रायगड जिल्हा, पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला सिधुदुर्ग जिल्हा आणि पूर्वेस सह्याद्री पर्वताच्या रांगा आहेत.

रत्नागिरी जिल्हयाचे भोगोलिक क्षेत्र 8,326 चौ. कि.मी. असून त्यावर नऊ तालुक्यामध्ये मिळून 1,515 गावे वसलेली आहेत. रत्नागिरी जिल्ह्याची लोकसंख्या 2001 च्या जनगणनेनुसार 16,96,482 इतकी आहे. एकूण लोकसंख्येपैकी पुरुष 46.83 टक्के तर स्त्रियांची संख्या 53.17 टक्के इतकी आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच असून उदनिर्वाहाचे साधन शेती हेच आहे.

## 2.3 रत्नागिरी जिल्ह्याची ऐतिहासिक माहिती

रत्नागिरी शहरावरती 16 व्या शतकात मुसलमानांचे राज्य होते. विजापूरकरांची ही भूमी म्हणजेच प्रशासकीय राजधानी होती.1731 मध्ये रत्नागिरी साताऱ्यांच्या छत्रपती शाहू

महाराजांच्या अधिकाराखाली आली. 1783 मध्ये पेशव्यांच्या एक जिल्ह्याचे ते मुख्य ठाणे होते. 1818 मध्ये ते ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली आले. 1822 मध्ये जिल्ह्याचे मुख्य ठाणे म्हणून रत्नागिरी निश्चित केले गेले. 1828 मध्ये रत्नागिरीमध्येच वाचनालयाची स्थापना झाली. 1863 मध्ये औद्योगिक प्रशिक्षण विद्यालय, 1967 मध्ये दिपगृह उभारणी, 1876 मध्ये रत्नागिरी नगरपालिकेची स्थापना करण्यात आली.

रत्नागिरी जिल्हा हा नररत्नांची खाण आहे. या जिल्हयाने राष्ट्राला अनेक वीरपुरुष, साहित्यिक, स्वातंत्रसेवक आणि समाजसेवक दिले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, दानशूर भागोजीशेठ कीर, कवी साने गुरुजी, युगप्रवर्तक कवी केशवसूत, अलीकडे क्रिडाक्षेत्रात महनीय कामगिरी बजावलेले एकनाथ सोलकर, चंद्रकात पंडित यांच्यासारखे क्रिकेटपटू, कबड्डीपटू मधू पाटील, नटश्रेष्ठ कै. शंकरराव घाणेकर आणि कितीतरी यांच्यासारखे थोर व्यक्ति या जिल्ह्यातूनच निर्माण झाल्या.

रत्नागिरी जिल्ह्याला किल्ले, ऐतिहासिक अवशेष, धार्मिक स्थळे, पूरातण लेणी याचे वरदान लाभलेले आहे. या जिल्ह्यात हर्णे बंदरात सुवर्णदूर्ग किल्ला असून तेथे आंगऱ्यांचे राज्य होते. दाभोळ शेजारीच अंजनवेलचा किल्ला आहे. तेथे तुकोजी आंगऱ्यांचे फ्रेंच नोकरीस होते. रत्नागिरी तालुक्यात जयगड येथे जूना किल्ला आहे. या किल्ल्यात अजूनही वस्ती असून तो दत्ताजी कानोजी आंगऱ्यांच्या सरदाराने बांधला. रत्नागिरी येथे शिवकालीन रत्नदुर्ग किल्ला असून किल्ल्यावर श्री भगवतीदेवीचे पूरातन मंदिर व दिपगृह आहे. चिपळुणजवळ गोवळकोट किल्ला आहे. याशिवाय मंडणगड तालुक्यात बाणकोट, दापोली तालुक्यात फत्तेगड, कनकदुर्ग, पालगड, खेड तालुक्यात महिपतगड, समरगड, प्रचितगड, भवानगड हे किल्ले आहेत. अशा प्रकारे रत्नागिरी जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा लाभला आहे.

## 2.4 रत्नागिरी जिल्ह्याची सांस्कृतिक माहिती

रत्नागिरी जिल्ह्यातील लोकांच्या चालीरितीवरुन उत्तर व दक्षिण संस्कृतीचा सुरेख मिलाफ झालेला दिसून येतो. सण व धार्मिक कार्यात होमहवन, स्थानिक देवदेवतांची पुजा इत्यादी चालीरिती रुढ आहेत. नमन, खेळे ही या भागातील महत्वपुर्ण अशी सांस्कृतिक कला समजली जाते. या लोकांची मराठी ही जरी एकमेव प्रमुख भाषा असली तरी येथे मराठी बोलीचे तीन- चार प्रकार आढळून येतात. मुस्लिम समाजामध्ये बोलली जाणारी भाषा ही प्रामुख्याने कोकणी व उर्दूचा सुंदर मिलाफ असल्याचे दिसून येतो. येथील वेशभूषा देखील संमिश्र स्वरुपाची दिसून येते. याचे कारण म्हणजे या जिल्ह्यात विविध जातीधर्माचे लोक एकत्र राहतात. व्यापाऱ्यामध्ये वाणी, लिंगायत, जैन, गुजर, भाटी, मारवाडी यांचा समावेश असून यांची संख्या कमी आहे. शेतकरी समाज संख्येने सर्वाधिक असून त्याचे एकूण नऊ वर्ग आहेत. खिश्चन हे धर्मातरीत असून पोतूगीजी खिश्चन आहेत. समुद्र किनारी भंडारी समाजाची वस्ती आढळून येते. हे लोक करारी व धाडसी वृत्तीचे म्हणून ओळखले जातात. गौरी गणपतीला घरोघरी आणून साजरी केला जाणारा गणेशोत्सव हा कोकणच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीत भर घालणारा महत्वाचा सण. त्याचबरोबर दहा दिवस चालणारा होळी सण हे या जिल्ह्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल. यावेळी पारंपारीक वेशभूषेत साजरे केले जाणारे नमन हा एक महत्वाचा कोकणचा सांस्कृतिक वारसा रत्नागिरी जिल्ह्याने जपलेला आहे.

रत्नागिरी जिल्हयाच्या सर्वागीण विकासासाठी 11 व्या वित्त आयोगाच्या तरतूदीनुसार गांडूळ शेती प्रशिक्षण वर्ग, महिला गटांना गांडूळ खत अर्थसहाय्य, नदीकाठावर भाजीपाला लागवड करणाऱ्या गटाला डिझेल, पेट्रोल, केरोसिन इंजिन देण्याकरीता अर्थसहाय्य देण्याची योजना, जिल्हा परीषद फंडातून घेतलेल्या शेतीच्या योजना, जिल्हा परीषद कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकिय योजना, पिक कर्ज योजना, राष्ट्रिय कृषी विमा योजना व किसान क्रेडिट कार्ड योजना इत्यादी विविध योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याच्या सर्वागीण विकासासाठी शासकिय पातळीवर प्रयत्न सुरु आहेत.

## 2.5 रत्नागिरी जिल्ह्याची शैक्षणिक माहिती

रत्नागिरी जिल्हा शैक्षणिक दृष्ट्या अग्रेसर असलेला दिसून येतो. प्राथमिक शाळा, मराठी, इंग्रजी, उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय याचबरोबर रत्नागिरी व खेड तालुक्यात प्रत्येकी 2 कला, वाणिज्य व विज्ञान वरीष्ठ महाविद्यालय इतर 7 तालुक्यात प्रत्येकी 1 कला, वाणिज्य व विज्ञान वरीष्ठ महाविद्यालय, खेड मध्ये डेंटल महाविद्यालय, एम.बी.ए.चे महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंजिनिअरींग कॉलेज, इतर ठिकाणी मत्स्य महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ उपकेंद्र, कोकण कृषी विद्यापीठ, इत्यादी शैक्षणिक सोई या जिह्यात उलपब्ध आहेत.

रत्नागिरी जिल्हा मंडणगड, दापोली, खेड, चिपळुण, गुहागर, संगमेश्वर, लांजा, राजापूर, रत्नागिरी असे 9 तालुके मिळून तयार झालेला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी तालुका हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाचा विचार करता कला, वाणिज्य व विज्ञान अशी मिळून अनुदानित 13 महाविद्यालये रत्नागिरी जिल्ह्यात आहेत. रत्नागिरी तालुक्यात 1 महाविदयालय, लांजा तालुक्यात 1 महाविद्यालय, राजापूर तालुक्यात 2 महाविद्यालये, संगमेश्वर तालुक्यात 1 महाविद्यालय, चिपळुण तालुक्यात 2 महाविद्यालये, गुहागर तालुक्यात 2 महाविद्यालये, खेड तालुक्यात 1 महाविद्यालय, दापोली तालुक्यात 2 महाविद्यालये व मंडणगड तालुक्यात 1 महाविदयालय असे यांचे तालुकानिहाय वर्गीकरण करता येईल. या शिवाय विनाअनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयेही रत्नागिरी तालुक्यात सुरु असून त्यांची संख्या 6 आहे.

## 2.6 समारोप

.   संशोधकाने रत्नागिरी जिल्ह्यातील अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचाच विचार केलेला असल्याने फक्त 13 महाविद्यालयाचांच समावेश संशोधन प्रकल्पासाठी केला आहे.

.

प्रकरण 3

# महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाशी संबंधित घटक

प्रकरण 3

# महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणाशी संबंधित घटक

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणाची सद्यस्थिती जाणून घेण्याचे निश्चित केल्यानंतर त्यासंबंधित घटक कोणते आहेत याचा विचार करण क्रमप्राप्त होते.

ग्रंथालयासाठी पुरेशी जागा नसणे व महाविदयालयाच्या एकाच खोलीत ग्रंथालय चालविणे ही गोष्ट काही नवीन नाही. परंतू सध्या यु.जी.सी. कडून इमारत बांधकामासाठी अनुदान मिळत असल्याने आता नवीन ग्रंथालयाच्या इमारती होताना दिसत आहेत. याच बरोबर ग्रंथालयाच्या संगणकीकरण म्हणावे तितके जोमाने सुरु झालेले नसले तरी काही अंशी सुरुवात तरी निश्चितच झालेली दिसत आहे.

ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेताना ग्रंथालयातील उपलब्ध सोई सुविधा, ग्रंथालय संगणकीकरणासाठी पुरक वातावरण फारसे उत्साहवर्धक वाटत नाही. याला अनेक घटक जबाबदार आहेत.

महाविद्यालयाचे व्यवस्थापनाकडून भरीव आर्थिक तरतुद ग्रंथालयाच्या विकासासाठी व्हायला पाहिजे तेवढी झालेली दिसत नाही.

ग्रंथालयाचे संगणकीकरण करताना प्रामुख्याने बाजारात विविध ग्रंथालय आज्ञावली उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणत्यातरी एका ग्रंथालय आज्ञावलीची निवड करणे गरजेचे असते. बाजारात उपलब्ध अनेक आज्ञावली पैकी आपल्या वाचकांना सर्वाधिक सेवा देण्यासाठी कोणती आज्ञावली उपयुक्त आहे, इतर ग्रंथालयाच्या उपलब्ध सेवा मिळविण्यासाठी ती आज्ञावली सहाय्यभूत आहे की नाही याचा विचार करुन आज्ञावलीची निवड करावी लागते.

ग्रंथालयात पुरेसा कर्मचारीवर्ग नाही. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार पदे भरुन देखील ग्रंथालयाच्या वाट्याला उपेक्षाच येते. याचे कारण म्हणजे शासन मान्यतेनुसार

ग्रंथालयात पद भरले म्हणून दाखविले जाते व प्रत्यक्ष महाविद्यालयात त्याला काम दुसऱ्याच जागी दिले जाते. ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याचे हे प्रमुख कारण म्हणावे लागेल. प्रशिक्षित मनुष्यबळाच्या बाबतीत जे 7-8 वर्ष सेवानिवृत्तीसाठी शिल्लक आहेत ते कर्मचारी प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छूकच नसल्याचे दिसते.

ग्रंथालय कमिटी सर्वच महाविद्यालयात असतात. परंतु त्यातील किती कार्यक्षम ग्रंथालय कमिटी आहेत याचा विचार करावा लागतो. कारण ग्रंथालयातील व्यवस्थापनाच्या दृष्टिने असणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी या कमिटीने ग्रंथपाल, प्राचार्य यांना सहाय्य करावयाचे असते परंतु प्रत्यक्षात मात्र असे घडताना फारसे दिसत नाही. मुळात ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या बाबतीत आर्थिक तरतुद नसेल तर ग्रंथालय कमिटीने आग्रही भूमिका घेवून ती तरतुद करणे गरजेचे असते.

ग्रंथालयाचा वाचक वर्ग विचारात घेवून त्या पद्धतीने ग्रंथालयीन सेवा पुरविली जाणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचक हा तसा वयाने मोठा व लगेचच नोकरी मिळविण्यासाठी सामोरा जाणारा असतो अशावेळी या वाचकांना मार्गदर्शक ठरेल, नोकरी मिळविण्याच्या कामी उपयोगी पडेल अशा गोष्टी ग्रंथालयामार्फत वाचकांना कशा पुरविल्या जातील याचा विचार करणे महत्वाचे ठरते. यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे फार महत्वाचे असते. त्याच्या साहय्याने अधिक जलद सेवा आपण वाचकांना देवू शकतो.

क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ खरेदी करताना सर्व विषयांना समान न्याय दिला गेला पाहिजे. अशा वेळी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असल्यास एका क्षणाधार्त विषयनिहाय ग्रंथाची यादी मिळवू शकतो ज्या विषयांना कमी ग्रंथ आहेत अशा विषयांना ग्रंथखरेदी मध्ये प्राधान्यक्रम देवून सर्व विषयांना समान न्याय देण्यासाठीही ग्रंथालयाचे संगणकीकरण उपयुक्त ठरते. मात्र या सर्वाचा गांभिर्याने विचार ग्रंथपालाने करावयास हवा.

ग्रंथालयातील नियतकालिके ही ग्रंथालयाचे अंदाजपत्रक विचारात घेवून खरेदी करावील लागत असल्याचे दिसते कारण आर्थिक तरतुद कमी पडत असल्याने ई नियतकालिके खरेदी करणे शक्य नसते. त्यामुळे ई नियतकालिके देखील  खूपच कमी महाविद्यालयातून दिसून येतात.

ग्रंथालयातील ईबुक्स च्या बाबतीतही आर्थिक प्रश्न, ग्रंथालयातील कमी उपलब्ध साधनसामुग्री व ईबुक्स वाचकांना उपलब्ध करुन देण्यासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा अभाव यामुळे होणारी वाचकांची गैरसोय आपणाला वारंवार नजरेसमोर येत आहे.

ऑडिओ, व्हिडीओ सीडीमध्ये देखील प्रचंड प्रमाणात ज्ञानभांडार उपलब्ध आहे. ग्रंथालयातील वाचक वर्ग व त्यांची गरज लक्षात घेवून त्याची उपलब्धता करुन घेणे हे ग्रंथपालाचे महत्वाचे काम आहे.  त्यासाठी त्याला आर्थिक तरतुदीपासून सर्वच घटकांचा विचार करावा लागतो.

ग्रंथालयाचे वर्गीकरण व तालिकीकरण करणे हे देखील ग्रंथालयातील महत्वाच्या कामापैकी एक महत्वाचे काम. संगणकीकरणामुळे हे काम अतिशय सुलभ होवू शकते.  परंतु प्रथम ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे आवश्यक आहे.  अनेक महाविद्यालयीन ग्रंथालयांचा एकत्रित कॅटलॉग करणेही सहज शक्य आहे.  परंतु यासाठी गरज आहे ती कर्मचारी, व्यवस्थापन मंडळ यांच्या संगणकीकरणाच्या दृष्टिने सकारात्मक मानसिकतेची.

ग्रंथालयाच्या दृष्टिने सेवा देण्यासाठी सर्वात महत्वाचे म्हणजे मनुष्यबळ.  ह्याच गोष्टीचा विचार ग्रंथपालाला प्रामुख्याने करावा लागतो.  वाचकांना चांगल्या प्रकारे सेवा देता याव्यात यासाठी आपल्याकडील उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करुन ग्रंथपाल नेहमीच सोईस्कर मार्ग काढीत असतो. संगणकीकरण केले तर मनुष्यबळही कमी लागून चांगली ग्रंथालय सेवा देता येणे शक्य आहे.

## समारोप

अशा प्रकारे माहिती तंत्रज्ञानाच्या युगात चांगल्या रीतीने व तत्परतेने ग्रंथालयीन सेवा देता यावी यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण हे अतिशय क्लिष्ट काम आहे. त्यापैकी योग्य त्या संगणक प्रणालीची ग्रंथालयासाठी निवड करणे, त्यासाठी आर्थिक तरतुद करणे, ग्रंथालयीन सेवकांसाठी योग्य ते प्रशिक्षण देण इत्यादी गोष्टीचा विचार आपणाला यामध्ये करता येईल.

## प्रकरण 4

# संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण

# प्रकरण 4

# संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण

## 4.1 प्रस्तावना

रत्नागिरी जिल्ह्यातील अनुदानित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये 13 महाविद्यालयांचा समावेश होतो. संशोधन कर्त्याच्या विषयाच्या दृष्टिकोणातून आढावा घेण्यासाठी पाठविण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण व सादरीकरण येथे केले आहे.

## 4.1 प्रश्नावलीला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण

संशोधन कर्त्याने व्याप्तीच्या अंतर्गत येणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यातील 13 महाविद्यालयीन ग्रंथालयाला प्रश्नावली पाठविल्या होत्या.

त्याला मिळालेला प्रतिसाद पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**तक्ता क्र. 4.1**
**प्रश्नावलीला मिळालेला प्रतिसाद**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | प्रश्नावली भरून आलेल्या महाविद्यालयांची संख्या | 12 | 92.00 |
| 2 | प्रश्नावली भरुन न आलेल्या महाविद्यालयांची संख्या | 1 | 8.00 |
| एकूण | | 13 | 100.00 |

(संदर्भ क्षेत्र अभ्यास)

उपरोक्त माहिती वरुन संशोधनकर्त्याच्या प्रश्नावलीला 92% प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते. एक महाविद्यालयाने प्रतिसाद दिलेला नाही कारण त्या महाविद्यालयात ग्रंथपाल पद रिक्त असल्याने पाठविलेली प्रश्नावली भरुन मिळाली नाही. उपरोक्त माहिती पुढील आकृतीत दर्शविली आहे.

**आकृती क्र. 4.1**

**संशोधनकर्त्याने पाठविलेल्या प्रश्नावलीना मिळालेला प्रतिसाद**




a प्रश्नावली भरून आलेल्या महाविद्यालयांची संख्या
b प्रश्नावली भरून न आलेल्या महाविद्यालयांची संख्या

## 4.2 स्थापना वर्ष निहाय महाविदयालयांचे वर्गीकरण

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ते महाविद्यालय कोणत्या वर्षी स्थापन झालेले आहे यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. त्याआधारे मिळालेल्या माहितीचे येथे विश्लेषण करण्यात आलेले आहे. पुढील तक्त्यावर दृष्टिक्षेप टाकल्यास हे लक्षात येते की स्वातंत्र्यापूर्वी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये फक्त गोगटे जोगळेकर महाविद्यालय हे एकमेव महाविद्यालय जिल्ह्याच्या ठिकाणी होते. त्यानंतर 1965 साली डि.बी.जे महाविद्यालयाची स्थापना झालेली दिसते. वराडकर कॉलेज दापोली हे रत्नागिरी जिल्ह्यातील तिसरे महाविद्यालय म्हणता येईल. तर 1990 साली खेड तालुक्यात कला व वाणिज्य महाविदयालय सुरु झाले. मात्र 1991-2000 या दशकात रत्नागिरी जिल्हयात 8 महाविद्यालयांची स्थापना झालेली दिसून येते.

**तक्ता क्र. 4.2**

**स्थापना वर्ष निहाय महाविद्यालयांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | स्थापना वर्ष | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1941-50 | 1 | 8.00 |
| 2 | 1951-60 | 0 | 00.00 |
| 3 | 1961-70 | 1 | 8.00 |
| 4 | 1971-80 | 1 | 8.00 |
| 5 | 1981-90 | 1 | 8.00 |
| 6 | 1991-2000 | 8 | 68.00 |
| | | 12 | 100.00 |

हीच माहिती पुढील आलेखात दर्शविली आहे.

**आलेख क्र. 4.2**

**महाविद्यालयांची स्थापना वर्ष**




## 4.3 महाविदयालयांचे सुरु असलेल्या अभ्यासक्रमनिहाय वर्गीकरण

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर कोणते अभ्यासक्रम चालविले जातात त्याआधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केलेले आहे.

**तक्ता क्र. 4.3**

**महाविद्यालयामधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पदवी | 6 | 50.00 |
| 2 | पदव्युत्तर पदवी | 6 | 50.00 |
| | | | 100.00 |

रत्नागिरी जिल्ह्यातील गोगटे जोगळेकर महाविद्यालय - रत्नागिरी, डि.बी.जे. महाविद्यालय - चिपळूण, दापोली सायन्स कॉलेज - दापोली, लांजा महाविद्यालय - लांजा, वराडकर बेलोसे महाविद्यालय - दापोली, राजापूर महाविद्यालय - राजापूर अशा 6 महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु आहेत. तर इतर 6 महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु नाहीत.

दापोली सायन्स कॉलेज फक्त विज्ञान शाखाच असून कला व वाणिज्य शाखा तेथे नाहीत. तर पाटपन्हाळे कॉलेज - पाटपन्हाळे, पाचल कॉलेज - पाचल, मार्गताम्हणे कॉलेज - मार्गताम्हणे या ठिकाणी कला व वाणिज्य या दोन शाखांचे पदवी अभ्यासक्रम सुरु असुन सायन्सचा पदवी अभ्यासक्रमही उपलब्ध नाही.

आय.सी.एस. महाविद्यालय - खेड, मंडणगड महाविद्यालय - मंडणगड, गुहागर महाविद्यालय - गुहागर येथे कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत परंतु पदव्युत्तर पदवी साठी कोणताही अभ्यासक्रम सुरु केलेला नाही. मात्र विद्यापीठाकडे पुढील शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम चालू करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.

## 4.4 महाविदयालयाची 2(f) व 12(B) साठी मान्यता

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालय युजीसी च्या अनुदानास पात्र आहे की नाही याची माहिती मिळविण्यासाठी संशोधनकाने विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.4**

**महाविदयालयाची 2(f) व 12(B) साठी अनुदानास पात्रता**

| अ.क्र. | मान्यता | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 2(f) व 12(B) मान्यता आहे | 11 | 92.00 |
| 2 | 2(f) व 12(B) मान्यता नाही | 1 | 8.00 |
| | | 12 | 100.00 |

हीच माहिती पुढील आकृतीत दर्शविली आहे.

**आकृती क्र. 4.3**

**महाविदयालयाची 2(f) व 12(B) साठी अनुदानास मान्यता**




रत्नागिरी जिल्ह्यातील एक उल्लेखनीय गोष्ट म्हणावी लागेल की 11 महाविद्यालये ही युजीसीच्या अनुदानासाठी पात्र असून फक्त पाचल महाविद्यालय, पाचल हे एकच

महाविद्यालय या योजनेस मान्यता न मिळालेले आहे. हे महाविद्यालय राजापूर तालुक्यात मोडते.

## 4.5 महाविदयालयाच्या नॅक मुल्यांकनाचे विश्लेषण

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन झालेले आहे का? असल्यास दोन्ही वेळच्या प्राप्त श्रेणी काय आहेत यासंदर्भात प्रश्नावली मध्ये प्रश्न विचारण्यात आले होते त्याला प्राप्त प्रतिसाद पुढील प्रमाणे मिळाला आहे.

तक्ता क्र. 4.5

महाविदयालयांच्या नॅक मुल्यांकनाचे विश्लेषण

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | नॅक मुल्याकंन वर्ष | ग्रेड | नॅक पुर्नमुल्यांकन वर्ष | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| 1 | गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी | 2009 | A | 2014 | A |
| 2 | डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण. | 2003 | B++ | 2014 | A |
| 3 | लांजा महाविद्यालय, लांजा | 2003 | B+ | 2010 | B |
| 4 | राजापूर महाविद्यालय, राजापूर | 2004 | B | 2012 | B |
| 5 | पाचल महाविद्यालय, पाचल. | 2003 | C++ | -- | -- |
| 6 | मार्गताम्हणे महाविद्यालय, मार्गताम्हणे | 2006 | C | 2012 | B |
| 7 | पाटपन्हाळे महाविद्यालय, पाटपन्हाळे | 2003 | C+ | 2012 | B |
| 8 | गुहागर महाविद्यालय, गुहागर. | 2004 | B | 2010 | B |
| 9 | मंडणगड महाविद्यालय, मंडणगड. | 2004 | C | 2011 | B |
| 10 | खेड महाविद्यालय, खेड. | 2004 | C+ | 2011 | B |
| 11 | वराडकर कॉलेज, दापोली. | 2004 | C | 2011 | B |
| 12 | दापोली सायन्स कॉलेज, दापोली. | 2004 | B | 2012 | B |

वरील माहितीवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, गोगटे महाविद्यालय, रत्नागिरी व डि.बी.जे महाविद्यालय चिपळूण यांना ऐ ग्रेड मिळालेली आहे बाकी महाविद्यालयांना बी ग्रेड प्राप्त आहे. तर पाचल महाविद्यालयाचे पुर्नमुल्यांकनही झालेले दिसत नाही.

दोनही मुल्यांकनाच्या ग्रेडवर नजर टाकल्यास हे लक्षात येते की महाविद्यालयाचा दर्जा हा निश्चितच सुधारत आहे.

## 4.6 ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची स्वतंत्र ईमारत आहे की नाही यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. त्याआधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

**तक्ता क्र. 4.6**

**ग्रंथालयाची स्वतंत्र ईमारत**

| अ.क्र. | तपशिल | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत आहे. | 05 | 42.00 |
| 2 | ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत नाही | 07 | 58.00 |

रत्नागिरी जिल्हयातील गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी, डि.बी.जे महाविद्यालय, चिपळूण, आय.सी.एस. महाविद्यालय, खेड, दापोली सायन्स कॉलेज, दापोली, वराडकर-बेलोसे महाविद्यालय, दापोली या महाविद्यालयीनी यु.जी.सी. च्या सहाय्याने ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत बांधली असून इतर महाविद्यालयांची ग्रंथालये महाविद्यालयीन इमारतीच्या एक किंवा दोन वर्गखोल्याचा वापर करुन चालविली जात आहेत.

## 4.7 ग्रंथालयामधील फर्निचर

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुरेसे फर्निचर आहे का? याबाबत माहिती विचारण्यात आली होती. त्याआधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

**तक्ता क्र. 4.7**

**ग्रंथालयात उपलब्ध फर्निचर**

| अ.क्र. | स्पष्टीकरण | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे | 07 | 52.00 |
| 2 | पुरेसे फर्निचर उपलब्ध नाही | 05 | 48.00 |
| | | 12 | 100.00 |

**आकृती क्र. 4.4**

**ग्रंथालयात उपलब्ध फर्निचर**

उपरोक्त माहिती पुढील आकृतीत दाखविली आहे.




रत्नागिरी जिल्हयातील गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी, डि.बी.जे महाविद्यालय, चिपळूण, दापोली सायन्स कॉलेज, दापोली, वराडकर-बेलोसे महाविद्यालय, दापोली, पाटपन्हाळे महाविदयालय, पाटपन्हाळे, मार्गताम्हणे महाविद्यालय, मार्गताम्हणे, मंडणगड महाविद्यालय मंडळ या महाविद्यालयीनी ग्रंथालयात पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे असे सूचीत केले आहे. तर फर्निचर पुरेसे उपलब्ध नाही म्हणणाऱ्या पाच महाविद्यालयामध्ये लांजा महाविद्यालय , लांजा, राजापूर महाविद्यालय, राजापूर, आय.सी.एस. महाविद्यालय, खेड, गुहागर कॉलेज, गुहागर, पाचल महाविद्यालय, पाचल यांचा समावेश होतो.

## 4.8 ग्रंथालयातील कर्मचारी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात पुरेसे कर्मचारी आहे का? याबाबत माहिती विचारण्यात आली होती. त्याआधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

तक्ता क्र. 4.8

ग्रंथालयातील सेवक वर्ग

| अ.क्र. | कर्मचारी | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | ग्रंथपाल | 12 |

| | | |
|---|---|---|
| 2 | सहा. ग्रंथपाल | 01 |
| 3 | लिपीक | 02 |
| 4 | ग्रंथालय परीचर | 12 |
| 5 | सेवक | 02 |

रत्नागिरी जिल्ह्यातील प्राप्त झालेल्या 12 प्रश्नावलीमधील सर्वच महाविद्यालयात ग्रंथपाल हे पद भरलेले दिसत आहे. सहा. ग्रंथपाल हे पद फक्त गोगटे-जोगळेकर या एकाच महाविदयालयात असल्याचे दिसत आहे. ग्रंथालयामध्ये लिपीक हे पद गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व डि.बी.जे महाविद्यालय, चिपळूण येथे भरलेलेल आहे. विशेषतः विद्यार्थी संख्येवर सहा. ग्रंथपाल व ग्रंथालय लिपीक ही पदे ठरत असल्याने ही दोन पदे शासन मान्य होण्यासाठीची विद्यार्थीसंख्या या दोनच महाविद्यालयामध्ये आहे. उर्ध्वरीत महाविद्यालयात ग्रंथपाल व ग्रंथालय परीचर ही दोन पदे सर्वच महाविद्यालयात असलेली दिसून येत आहेत. मात्र ग्रंथालय सेवक हे पदही फक्त दोन महाविद्यालयात दिसून येत आहे. ती महाविद्यालये म्हणजेच गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व डि.बी.जे. कॉलेज, चिपळुण होय.

यालाच अनुसरुन पुढील प्रश्न विचारण्यात आला होता की ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी वर्ग आहे का?

या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील आलेखात दर्शविला आहे.

**आलेख क्र. 4.5**

**ग्रंथालयात कर्मचारी वर्ग**




ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी आहे असे उत्तर नमुद करणाऱ्या महाविद्यालयामध्ये पाच महाविद्यालयांचा समावेश होतो. यामध्ये गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी, डि.बी. जे कॉलेज चिपळूण, दापोली सायन्स कॉलेज दापोली, गुहागर महाविद्यालय, गुहागर, लांजा महाविद्यालय लांजा याचा समावेश होतो तर इतर सात महाविद्यालयांनी ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याचे नमुद केलेले आहे.

## 4.9 ग्रंथालयातील कमिटी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कमिटीची स्थापना केलेली आहे का? या आधारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे 12 महाविद्यालयात ग्रंथालय कमिटी असल्याचे नमुद करण्यात आलेले असून वर्षातून दोन वेळा कमिटीची बैठक घेतली जात असल्याचे 10 महाविद्यालयांनी नमुद केलेले आहे.

पाटपन्हाळे महाविद्यालयाने एक वर्षात 4 वेळा सभा घेतली जात असल्याचे नमुद केले असून पाचल महाविद्यालयाने वर्षातून 12 वेळा सभा घेतली जात असल्याते नमुद केले आहे

परंतु याबाबत संशोधनकर्त्याला नमुद करावेसे वाटते की हा प्रश्न संबंधिताला समजला नसावा किंवा उत्तर चुकुन दिले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## 4.10 ग्रंथालयातील वाचक वर्ग

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयात कोणकोणते वाचक येतात किंवा ग्रंथालय कोणाकोणाला सेवा देते? हे जाणून घेण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

त्याआधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

**तक्ता क्र. 4.9**

**ग्रंथालयातील वाचक वर्ग**

| अ.क्र. | वाचक वर्ग | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | शिक्षक | 12 |
| 2 | शिक्षकेत्तर कर्मचारी | 12 |
| 3 | विद्यार्थी | 12 |
| 4 | माजी विद्यार्थी | 09 |
| 5 | संस्था पदाधिकारी | 09 |

रत्नागिरी जिल्ह्यातील 12 महाविद्यालयापैकी 09 महाविद्यालयातून माजी विद्यार्थी व संस्था पदाधिकारी यांनाही ग्रंथालय सेवेचा लाभ मिळत असल्याचे दिसत आहे. परंतु गुहागर महाविद्यालय गुहागर, लांजा महाविद्यालय, लांजा, मार्गताम्हणे महाविद्यालय मार्गताम्हणे या

तीन महाविद्यालयातून फक्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनाच ग्रंथालय सेवा दिली जात असल्याचे नमुद केलेले आहे.

## 4.11 ग्रंथालयाची वेळ

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची वेळ कोणती आहे? हे जाणून घेण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या आधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

सर्वच महाविद्यालयाची ग्रंथालये ही सकाळी 8.00 ते 9.00 च्या दरम्यान सुरु होतात व सायंकाळी 4.30 ते 5.30 या दरम्यान बंद होतात.

परीक्षा काळावधीत ग्रंथालय सुट्टीच्या काळावधीत चालू ठेवले जाते का? असा प्रश्न संशोधनकर्त्याने विचारला होता. त्या प्रश्नाला सर्वानीच नकारार्थी उत्तर दिले. मात्र 4 महाविद्यालयानी याकाळावधीत ग्रंथालयाची वेळ उघडे राहण्याची वेळ वाढविली जाते असे नमुद करुन गुहागर महाविद्यालय गुहागर व दापोली सायन्स महाविद्यालय दापोली हे नियोजती वेळेपेक्षा 1तास ग्रंथालय अधिक उघडे ठेवतात. डि.बी.जे. महाविद्यालय परीक्षा काळावधीत ग्रंथालय सकाळी 7.30 ते रात्री 10.00 वाजेपर्यत उघडे ठेवत असल्याचे नमुद केले आहे तर गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी यांनी परीक्षा काळावधीत ग्रंथालय सकाळी 7.30 ते रात्री 12.00 पर्यत उघडे ठेवत असल्याचे नमुद केले आहे.

## 4.12 ग्रंथालातील क्रमिक ग्रंथसंख्या

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती क्रमिक पुस्तके आहेत? या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. प्राप्त माहितीचे विश्लेषण येथे केले आहे.

**तक्ता क्र. 4.10**

**ग्रंथालयातील उपलब्ध क्रमिक पुस्तके**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 0 - 10000 | 9 | 75.00 |
| 2 | 10001-20000 | 1 | 8.00 |
| 3 | 20001-30000 | 0 | 0 |
| 4 | 30001-40000 | 2 | 17.00 |
| | | 12 | 100.00 |

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयातील ग्रंथालयाची पुस्तकांची संख्या विचारात घेता 10000 च्या खाली ग्रंथसंख्या असलेल्या महाविद्यालयांची संखया 9 आहे. तर आय.सी.एस. महाविद्यालय खेड या महाविद्यालयातील ग्रंथांची संख्या 11634 आहे. तर डि.बी. जे महाविद्यालय, चिपळूण व गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी या दोन महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथाची संख्या 38000च्या वरती आहे.

हीच माहिती पुढील आलेखात दर्शविली आहे.

**आलेख क्र. 4.6**

**ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथसंख्या**



ही दोनही महाविद्यालये स्थापना पहाता गोगटे कॉलेज स्वातंत्र्यापूर्वीचे आहे, तर डि. बी. जे महाविद्यालय 1965 साली स्थापन झालेले आहे यामुळे या दोन महाविद्यालांच्या व इतर महाविद्यालये 1990 नंतरची आहेत त्यामुळे संख्येत एवढी तफावत निदर्शनास येते.

## 4.13 ग्रंथालयातील संदर्भग्रंथ संख्या

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती क्रमिक पुस्तके आहेत? या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयातील संदर्भ ग्रंथांची संख्या विचारात घेता 10000 च्या खाली ग्रंथसंख्या असलेल्या महाविद्यालयांची संख्या 9 आहे. तर 20000 च्या वरती संदर्भ ग्रंथ दापोली महाविद्यालयात उपलब्ध असून डि.बी. जे महाविद्यालय, चिपळूण व गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी या दोन महाविद्यालयीन ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाची संख्या 30000च्या वरती आहे. हीच माहिती पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. 4.11**

**ग्रंथालयातील उपलब्ध संदर्भग्रंथ**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संखया | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 0 - 10000 | 9 | 75.00 |
| 2 | 10001-20000 | 0 | 0.00 |
| 3 | 20001-30000 | 1 | 8.00 |
| 4 | 30001-40000 | 2 | 17.00 |
| | | 12 | 100.00 |

## 4.14 ग्रंथालयातील नियतकालिके

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती नियतकालिके उपलब्ध आहेत? या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. रत्नागिरी

जिल्ह्यातील महाविदयालयातील नियतकांलिकांची संख्या विचारात घेता पुढील आकडेवारी निदर्शनास येते.

**तक्ता क्र. 4.12**

**ग्रंथालयातील उपलब्ध नियतकालिके**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1-25 | 1 | 8.00 |
| 2 | 26-50 | 6 | 50.00 |
| 3 | 51-75 | 4 | 34.00 |
| 4 | 76-100 | 0 | 0.00 |
| 5 | 100 च्या पुढे | 1 | 8.00 |

100 च्या पुढे नियतकालिकांची संख्या असलेले गोगटे महाविद्यालय आहे. तर पाचल महाविद्यालयात नियतकालिकांची संख्या 25 पेक्षा कमी आहे. इतर महाविद्यालयातील नियतकालिकांची संख्या ही 26 ते 75 दरम्यान आहेत.

यामध्ये पुढील प्रश्न विचारण्यात आला होता की त्यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रिय स्तरावरील नियतकालिकांचा समावेश आहे का ?

या प्रश्नाचा विचार करता पुढील चित्र दिसून येते.

**तक्ता क्र. 4.13**

**ग्रंथालयातील उपलब्ध राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय नियतकालिके**

| अ.क्र. | स्पष्टीकरण | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय नियतकालिके | 7 | 58.00 |
| 2 | आंतरराष्ट्रिय नियतकालिके | 5 | 42.00 |

हिच माहिती पुढील आकृतीत दर्शविली आहे.

**आकृती क्र. 4.7**

**राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची उपलब्धता**




वरील माहितीवर लक्ष टाकल्यास गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी, डि.बी.जे महाविद्यालय, चिपळूण, लांजा महाविद्यालय, लांजा, दापोली सायन्स कॉलेज, दापोली व गुहागर महाविदयालय, गुहागर या पाच महाविद्यालयात आंतरराष्ट्रिय नियतकालिके उपलब्ध असून इतर सात महाविद्यालयामध्ये फक्त राष्ट्रिय नियतकालिकांचाच समावेश असल्याचे दिसते.

## 4.15 ग्रंथालयातील उपलब्ध सीडी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती सीडी उपलब्ध आहेत? या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयातील सीडी संख्या विचारात घेता पुढील आकडेवारी निदर्शनास येते.

**तक्ता क्र. 4.14**

**ग्रंथालयातील उपलब्ध सीडी**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 0 | 3 | 25.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 1-50 | 4 | 33.00 |
| 3 | 51-100 | 3 | 25.00 |
| 4 | 101 च्या पुढे | 2 | 17.00 |
| | | 12 | 100.00 |

पाचल महाविद्यालय, पाचल, दापोली महाविद्यालय, दापोली, मार्गताम्हणे महाविद्यालय, मार्गताम्हणे या तीनही महाविद्यलायाच्या ग्रंथालयात एकही सीडी उपलब्ध नाही. तर 101 च्या पुढे सीडी उपलब्ध असणाऱ्या मध्ये गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी यांच्या कडे 400 सीडी तर डि. बी. जे महाविद्यालय चिपळूण यांच्याकडे 217

सीडी उपलब्ध आहेत. इतर महाविद्यालयात मात्र या प्रकारच्या साहित्याचे प्रमाण खूपच कमी प्रमाणात उपलब्ध असल्याचे निदर्शनास येत आहे.

## 4.16 ग्रंथालमातील उपलब्ध ई-बुक्स

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती ईबुक्स उपलब्ध आहेत? या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयातील ईबुक्स ची संख्या विचारात घेता पुढील आकडेवारी निदर्शनास येते.

**तक्ता क्र. 4.15**

**ग्रंथालयातील उपलब्ध ई-बुक्स**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | ई बुक्स असलेली | 4 | 33.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| | महाविद्यालये | | |
| 2 | ई बुक्स नसलेली महाविद्यालये | 8 | 67.00 |
| | | 10 | 100.00 |

गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी, डि. बी. जे महाविद्यालय चिपळूण, लांजा महाविद्यालय लांजा व दापोली सायन्स महाविद्यालय, दापोली या चार महाविद्यालयात N-list च्या सहाय्याने 51000 च्या वरती ईबुक्स उपलब्ध आहेत. इतर 8 महाविद्यालयात एकही ईबुक्स उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. मात्र या बाबतीत आय.सी.एस. महाविद्यालय, खेड व मंडणगड महाविद्यालय, मंडणगड ही दोन महाविद्यालये प्रयत्नशील असून पुढील 2 ते 3 महिन्यात त्यांच्याकडेही ई बुक्स उपलब्ध होतील असे नमुद करण्यात आले आहे.

## 4.17 ग्रंथालयातील उपलब्ध दैनिके

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात किती दैनिके उपलब्ध आहेत? त्याचे कोणत्या माध्यमातून उपलबध आहेत या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयातील दैनिकांची संख्या विचारात घेता पुढील आकडेवारी निदर्शनास येते.

**तक्ता क्र. 4.16**

**ग्रंथालयातील उपलब्ध दैनिके**

| अ.क्र. | संख्या | महाविदयालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1-5 | 2 | 17.00 |
| 2 | 6-10 | 4 | 33.00 |
| 3 | 11-15 | 5 | 42.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 16 च्या पुढे | 1 | 8.00 |
| | | 12 | 100.00 |

गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी या महाविद्यालयात 21 दैनिके सुरु असून सगळ्यात कमी दैनिके पाचल महाविद्यालय, पाचल व मार्गताम्हणे महाविद्यालय मार्गताम्हणे येथे उपलब्ध आहेत.

मात्र मराठी व इंग्रजी माध्यमाची दैनिके सर्वच्यासर्व 12 महाविद्यालयात उपलब्ध असून फक्त 9 महाविद्यालयात हिंदी दैनिक घेतले जातात मात्र दापोली सायन्स कॉलेज दापोली, मंडणगड महाविद्यालय, मंडणगड, पाचल महाविद्यालय पाचल या तीनही महाविद्यालयात एकही हिंदी नियतकालिक घेत नसल्याचे निदर्शनास आले. तर उर्दू दैनिक रत्नागिरी जिल्हयातील एकाही महाविद्यालयात येत नाही. उर्दू भाषिक विदयार्थी तर निश्चितच रत्नागिरी जिल्हयात दिसून येतात. मात्र विशेषत महाविद्यालयत उर्दू विषय गोगटे जोगळेकर येथे उपलब्ध असूनही उर्दू नियतकालिक घेत नसल्याचे दिसते.

## 4.18 वाचकांना आकर्षित करण्यासाठी योजना

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांची माहिती संकलित करताना ग्रंथालयात वाचक अधिकाधिक यावेत यासाठी कोणकोणत्या योजना ग्रंथालयामार्फत राबविल्या जातात याचा विचार करण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे होता.

**तक्ता क्र. 4.17**

**वाचकांना आकर्षित करण्यासाठीच्या योजना**

| अ.क्र. | योजना | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | ग्रंथप्रदर्शन | 12 |
| 2 | ग्रंथालय व्याख्यान | 10 |
| 3 | नवीन ग्रंथांचे नोटीस बोर्डमध्ये प्रदर्शन | 12 |
| 4 | नवीन ग्रंथाची यादी प्रदर्शित | 10 |

वाचकांना आकर्षित करणयासाठी जवळ जवळ सर्वच महाविद्यालये वरील उपक्रम राबवित असल्याचे दिसून येत आहे हीच माहिती पुढील आलेखात दर्शविली आहे.

**आलेख क्र. 4.8**

वाचकांना आकर्षित करण्यासाठीच्या योजना




## 4.19 ग्रंथालय वर्गीकरण पध्दत

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयाचे वर्गीकरण केलेले आहे की नाही व केले असल्यास कोणती वर्गीकरण पध्दती वापरली आहे हे पाहण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे होता.

**तक्ता क्र. 4.18**

**ग्रंथालयाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | योजना | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | व्दिबिंदू | 01 |
| 2 | डी.डी.सी | 11 |

रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वच ग्रंथालयाचे वर्गीकरणाचे काम पूर्ण केलेल असून 11 महाविद्यालयांनी डि.डि.सी. चा वापर केला असल्याचे दिसून येते तर फक्त राजापूर महाविदयालय राजापूर या एकच महाविद्यालयाने वर्गीकरणासाठी व्दिबिंदू वर्गीकरण पध्दत वापरली असल्याचे दिसते.

## 4.20 ग्रंथालय तालिकीकरण

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयाचे तालिकीकरण केलेले आहे की नाही हे पाहण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे होता.

**तक्ता क्र. 4.19**

**ग्रंथालयाचे तालिकीकरण**

| अ.क्र. | योजना | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | तालिकीकरण केलेले आहे | 06 |
| 2 | तालिकीकरण केलेले नाही | 06 |

या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पाहता सहा महाविद्यालयांनी तालिकीकरण केलेले असून गोगटे-जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी, दापोली महाविद्यालय, दापोली, दापोली सायन्स महाविद्यालय दापोली, डी.बी. जे महाविद्यालय, चिपळूण, गुहागर महाविद्यालय, गुहागर, पाटपन्हाळे महाविद्यालय, पाटपन्हाळे या ते अद्ययावत आहे.

आय.सी.एस. महाविद्यालय खेड हे ग्रंथालय तालिकीकरण करणार नसून त्यांनी ग्रंथालयाचे सॉफ्टवेअर विकत घेतले असून विद्यार्थ्यासाठी 2 संगणकावर OPAC सिस्टिम चालू करुन देणार असल्याचे सांगितले व प्राध्यापकांना त्याच्या स्टाफरुमध्येही याचा वापर करता येणार असल्याचे नमुद केले असून याच शैक्षणिक वर्षात व्दितीय सत्रापासून ही सेवा विद्यार्थी व प्राध्यापकांना देण्यात येणार असल्याचे नमुद केले आहे.

## 4.21 ग्रंथालयातील विविध कक्ष

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयामध्ये कोणकोणते विभाग आहेत हे पाहण्यासाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे होता.

तक्ता क्र. 4.20 ग्रंथालयातील उपलब्ध कक्ष

| अ.क्र. | कक्ष | महाविदयालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | वाचन कक्ष | 12 |
| 2 | संदर्भ विभाग | 12 |
| 3 | ग्रंथ संस्करण विभाग | 10 |
| 4 | नियतकालिक विभाग | 12 |
| 5 | ग्रंथसंग्रह विभाग | 12 |
| 6 | देवघेव विभाग | 12 |
| 7 | झेरॉक्स विभाग | 07 |
| 8 | इंटरनेट कक्ष | 05 |
| 9 | ऑडिओ व्हिडीओ विभाग | 05 |

या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पाहता सर्व महाविद्यालया मध्ये वाचनकक्ष, संदर्भ विभाग, नियतकालिक विभाग, ग्रंथसंग्रह विभाग , देवघेव विभाग असल्याचे दिसत आहे. पाचल महाविद्यालय पाचल व लांजा महाविद्यालय, लांजा या दोन महाविद्यालयात ग्रंथसंस्करण विभाग उपलब्ध नाही. तर दापोली महाविद्यालय, दापोली, पाचल महाविद्यालय, पाचल, गुहागर महाविद्यालय, गुहागर, पाटपन्हाळे महाविद्यालय, पाटपन्हाळे, लांजा महाविद्यालय लांजा व राजापूर महाविद्यालय राजापूर या पाच महाविद्यालयाच इंटरनेट व ऑडिओ व्हिडीओ कक्ष उपलब्ध नाही.

## 4.22 ग्रंथालयाचे संगणकीकरण स्थिती

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण झालेले आहे का याची पडताळणी करण्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.21**

**ग्रंथालय संगणकीकरणाची स्थिती**

| अ.क्र. | तपशिल | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | संगणकीकरण झालेले आहे. | 02 |
| 2 | संगणकीकरणाचे काम चालू आहे. | 08 |
| 3 | संगणकीकरण केलेले नाही | 02 |

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयाचे संगणकीकरण झालेले नाही अशा मध्ये मार्गताम्हणे महाविद्यालय, मार्गताम्हणे व मंडणगड महाविद्यालय मंडणगड या दोन महाविद्यालयांचा समावेश होतो. तर डि. बी. जे महाविद्यालय, चिपळूण व गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी या दोन महाविद्यालयांचे संगणकीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. इतर महाविद्यालयाचे संगणकीरणाचे काम चालू असल्याचे नमुद केलेले आहे. हीच माहिती पुढील आलेखात दर्शविली आहे.

**आलेख क्र. 4.9**

**महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती**




## 4.23 ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांमध्ये इंटरनेट सुविधा आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.22**
**ग्रंथालयामध्ये इंटरनेट सुविधा**

| अ.क्र. | तपशिल | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | स्वतंत्र कनेक्शन आहे | 02 |
| 2 | महाविद्यालयातून LAN आहे | 08 |
| 3 | कनेक्शन नाही | 02 |

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयामध्ये स्वतंत्र इंटरनेट सुविधा फक्त दोन महाविद्यालयात उपलब्ध असून इतर आठ महाविद्यालयातील ग्रंथालयात लॅन व्दारे नेटची सुविधा महाविद्यालयातून घेतलेली आहे तर दोन महाविद्यालयातील ग्रंथालयात नेटचे कनेक्शन नसल्याचे दिसत आहे.

हीच माहिती पुढील आकृतीत दर्शविला आहे.

**आकृती क्र. 4.10**

**महाविद्यालयीन ग्रंथालयात इंटरनेटची सुविधा**




## 4.24 ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक, प्रिंटर, इत्यादी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणासाठी उपलब्ध साहित्य संगणक प्रिंटर इत्यादी सुविधा आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पुढे नोंदविला आहे. यावर नजर टाकल्यास फक्त गोगटे जोगळेकर महाविद्यालय व चिपळूण महाविद्यालय ही दोन महाविद्यालये सोडल्यास इतर दहा महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये संगणकांची संख्या तीनच्या वरती असलेली दिसत नाही उपरोक्त दोन महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये 16 च्या वरती संगणक असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. याचे कारणही स्पष्ट आहे की याच दोन महाविद्यालयीन ग्रंथालयांचे संगणकीकरणाचे काम पुर्ण झालेले दिसत आहे.

**तक्ता क्र. 4.23**

**ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक प्रिंटर इत्यादी**

| अ.क्र. | उपकरणे | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | सर्व्हर | 02 |
| 2 | संगणक | 10 |
| 3 | प्रिंटर | 08 |
| 4 | बारकोड रिडर | 03 |
| 5 | स्कॅनर | 05 |
| 6 | एस. सी.डी. प्रोजेक्टर | 00 |
| 7 | यु.पी.एस. | 02 |
| 8 | बॅकअप | 02 |

दोन महाविद्यालयात यु.पी.एस.ची सुविधा असून वारंवार विजपूरवठा खंडित होत असल्यामुळे यु.पी.एस. पुरत नसल्याचे दोन महाविद्यालयांनी नमुद केलेले आहे. हीच माहिती पुढील आलेखात दर्शविली आहे.

**आकृती क्र. 4.11**

**ग्रंथालयामध्ये उपलब्ध संगणक प्रिंटर इत्यादी**




## 4.25 ग्रंथालयामधील संगणकीकरण केलेले विभाग

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणासाठी कोणकोणत्या विभागाची निवड केली आहे हे पाहण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद येथे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.24**

**ग्रंथालयामधील संगणकीकरण केलेले विभाग**

| अ.क्र. | विभाग | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | देवघेव | 06 |
| 2 | तालिकीकरण | 02 |
| 3 | अंदाजपत्रक | 02 |
| 4 | ग्रंथनोंद | 06 |
| 5 | बारकोडींग | 02 |
| 6 | ग्रंथ पडताळणी | 01 |

रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण 12 महाविद्यालयांपैकी गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व चिपळूण महाविद्यालय ही दोन महाविद्यालये सोडल्यास इतर 04 महाविदयालयांनी ग्रंथनोंद व ग्रंथदेवघेव हे दोनच विभाग संगणकीकृत केलेले दिसत आहेत तर 04 महाविदयालयांनी संगणकीकरणाचे काम सुरु असून प्रत्यक्ष कार्य कोणत्याच विभागात सुरु नसल्याचे सांगितले आहे तर 02 महाविद्यालयानी संगणकीकरणाच्या कामाला सुरुवातच केलेली नसल्याचे नमुद केलेले आहे.

## 4.26 ग्रंथालयामधील उपलब्ध आज्ञावली

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणासाठी कोणकोणत्या आज्ञावली ग्रंथालयामध्ये वापरण्यात आल्या आहेत याची माहिती मिळविण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद येथे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.25**

**ग्रंथालयामधील उपलब्ध आज्ञावली**

| अ.क्र. | संगणक प्रणाली | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | नेटवर्क ऑपरेटिंग सिस्टिम | 04 |
| 2 | लायब्ररी मॅनेजमेंट सिस्टिम | 06 |
| 3 | डिजिटल लायब्ररी सॉफ्टवेअर | 00 |
| 4 | नेट मॅनेजमेंट सॉफ्टवेअर | 01 |
| 5 | ॲटिव्हायरस सॉफ्टवेअर | 09 |

रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण 12 महाविद्यालयांपैकी गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी या एकाच महाविद्यालयात नेट मॅनेजमेंट सॉफ्टवेअर असून गोगटे जोगळेकर, रत्नागिरी, डि.बी.जे महाविद्यालय, चिपळूण, लांजा महाविद्यालय, लांजा, खेड महाविद्यालय, खेड, गुहागर महाविदयालय, गुहागर व दापोली महाविद्यालय, दापोली या महाविद्यालयांमध्ये लायब्ररी मॅनेजमेंट सिस्टिम घेतलेली असून ॲटिव्हायरस सॉफ्टवेअर सर्वच महाविदयालयीन ग्रंथालयातील संगणकाला उपलब्ध असल्याचे नमूद केलेले आहे

आकृती क्र. 4.12

ग्रंथालयामधील उपलब्ध आज्ञावली




## 4.27 ग्रंथालयाची Inflibnet शी जोडणी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयीन किती ग्रंथालयांनी Inflibnet शी जोडणी करुन घेतलेली आहे याची माहिती मिळविण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद येथे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.26**

**ग्रंथालयाची Inflibnet शी जोडणी**

| अ.क्र. | तपशिल | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | Inflibnet शी जोडणी केलेली आहे | 06 |
| 2 | Inflibnet शी जोडणी केलेली नाही | 06 |

रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण 12 महाविद्यालयांपैकी गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी, दापोली महाविद्यालय दापोली, मार्गताम्हणे महाविद्यालय, मार्गताम्हणे, लांजा महाविदयालय लांजा, गुहागर महाविदयालय गुहागर यांनी Inflibnet शी जोडणी केलेली असून वराडकर महाविद्यालय, दापोली, पाचल महाविदयालय, पाचल, पाटपन्हाळे महाविद्यालय, पाटपन्हाळे, डि. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण, मंडणगड महाविद्यालय, मंडणगड, खेड महाविद्यालय, खेड यांनी जोडणी केलेली नसल्याचे नमुद केलेले असून

मंडणगड महाविद्यालय, मंड़णगड व खेड महाविद्यालय, खेड यावर्षी जोडणी करुन घेयच्या प्रयत्नात असल्याचे नमुद केलेले आहे.

## 4.28 ग्रंथालयाची वेबसाईट

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयीन ग्रंथालयाची स्वतंत्र वेबसाईट आहे काय हे पाहण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला सर्वानीच नकारार्थी प्रतिसाद नोंदविला आहे. त्यामुळेच कोणत्याच महाविद्यालयीन ग्रंथालयाची स्वतंत्र वेबसाईट नसून महाविद्यालयाच्या बेवसाईट वर ग्रंथालयाची माहिती उपलब्ध असल्याचे नोंदविले आहे.

## 4.29 ग्रंथालयामध्ये उपलब्ध नेटब्राऊझर

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयीन ग्रंथालयामध्ये कोणकोणते नेटब्राऊझर वापरले जातात हे माहिती करुन घेण्यासाठी विचारलेल्या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद येथे नोंदविला आहे.

**तक्ता क्र. 4.27**

**ग्रंथालयामध्ये उपलब्ध नेटब्राऊझर**

| अ.क्र. | तपशिल | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|
| 1 | नेटस्केप | 02 |
| 2 | इंटरनेट एक्सफलोर | 11 |
| 3 | मोझिला | 08 |
| 4 | ओपेरा | 01 |
| 5 | लिनेक्स | 02 |

रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण 12 महाविद्यालयांपैकी 11 महाविद्यालयात इंटरनेट एक्सफ्लोरर वापरले जात असल्याचे नमुद करुन गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी व

डि. बी. जे. महाविद्यालय चिपळूण यांच्याकडे लिनेक्सही वापरले जात असल्याचे नमुद केले आहे. नेटस्केप मार्गताम्हणे व पाचल या दोन महाविद्यालयीन ग्रंथालयात वापरले जाते.

## 4.30 भविष्यकालीन योजना

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविदयालयांच्या ग्रंथालयांना पाठविण्यात आलेल्या प्रश्नावली मध्ये भविष्यकालीन तरतुद विचारण्यात आलेली होती.

या प्रश्नाला मिळालेला प्रतिसाद पाहता सर्वच ग्रंथालयांना आपली पुढे पुढे प्रगती होत जावी असे वाटताना दिसत आहे. ज्या महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या स्वतंत्र इमारती नाहीत त्यांनी भविष्यकालीन योजनेमध्ये ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत बांधणार असल्याचे मत नोंदविले आहे. यामध्ये गुहागर महाविद्यालय गुहागर, मंडणगड महाविद्यालय मंडणगड, ज्या ग्रंथालयाचे संगणकीकरण पुर्ण झालेले आहे अशी ग्रंथालये डिजिटल साहित्याच्या स्वरुपात वाढ करण्याचा मानस नोंदवून त्यांची वाटचाल डिजिटलाईज ग्रंथालयाकडे झुकताना दिसत आहे. यामध्ये गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी व डि.बी.जे महाविद्यालय चिपळुण यांचा समावेश होता. ज्या महाविद्यालयानी संगणकीकरण केलेले नाही अशा वराडकर महाविद्यालय, दापोली, पाचल महाविद्यालय पाचल , मंडणगड महाविद्यालय मंडणगड व पाटपन्हाळे महाविद्यालय पाटपन्हाळे या चार महाविद्यालयांनी संगणकीकरणाचा मानस व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे डि.बी.जे महाविद्यालय चिपळूण यांनी ग्रंथालयात RFID Technology वापरण्यात येणार असल्याचे नोंदवून आय.सी.एस. महाविद्यालय खेड व दापोली सायन्स कॉलेजने बारकोडींग करण्याचे काम हाती घेतले असल्याचे नमूद केले आहे. अशा प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयाकडून भरुन आलेल्या प्रश्नावलीचे येथे विश्लेषण व सादरीकरण केलेले आहे

## प्रकरण 5

# ग्रंथालयाच्या संगणकीकरणातील आढळलेल्या समस्या व निष्कर्ष

# प्रकरण 5

# ग्रंथालयाच्या संगणकीकरणातील आढळलेल्या समस्या व निष्कर्ष

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या संगणकीकरणाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधकाने महाविद्यालयांना पाठविलेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण व सादरीकरण केल्यानंतर दिसून आलेल्या समस्या व निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडता येतील.

1) ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत व त्यामुळे कार्यक्षम ग्रंथालय सेवा देता येईल असे प्रत्येकाला वाटते काही महाविद्यालये अपवाद वगळता महाविद्यालयाच्या एका खोलीत ग्रंथालय चालविणे याला रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालये देखील अपवाद नाहीत. अजूनही काही महाविद्यालयीन ग्रंथालये महाविद्यालयाच्या एका खोलीत चालविली जात आहेत. अनुषंगाने येणाऱ्या ग्रंथालयाच्या संगणकीकरण व विकासासंदर्भातील सर्वच्या सर्व समस्या रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये पहावयास मिळतात.

2) ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेताना ग्रंथालयातील उपलब्ध सोई सुविधा, ग्रंथालय संगणकीकरणासाठी पुरक वातावरण फारसे उत्साहवर्धक वाटत नाही. कारण नॅकचे पुर्नमुल्यांकन झालेल्या 11 महाविदयालयांच्या संगणकीकरणाचे कामही अजून पूर्णत्वाला गेलेले दिसत नाही. याबाबतीत मुख्य अडचण आर्थिक समस्या ही नोंद करण्यात आलेली आहे. ग्रंथालयाचे

संगणकीकरण पूर्ण झालेल्या दोन महाविद्यालयांनी वारंवार विजपुरवठा खंडीत होत असल्याने बॅकअॅप ची सुविधा अपुरी पडत असल्याचे नोंदविले आहे.

3) ग्रंथालयात पुरेसा कर्मचारीवर्ग नाही. महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार पदे भरुन देखील ग्रंथालयाच्या वाट्याला उपेक्षाच येते. याचे कारण म्हणजे शासन मान्यतेनुसार ग्रंथालयात पद भरले म्हणून दाखविले जाते व प्रत्यक्ष महाविद्यालयात त्याला काम दुसऱ्याच जागी दिले जाते. ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याचे हे प्रमुख कारण म्हणावे लागेल. प्रशिक्षित मनुष्यबळाच्या बाबतीत जे 7-8 वर्ष सेवानिवृत्तीसाठी शिल्लक आहेत ते कर्मचारी प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छूकच नसल्याचे दिसते. यामुळेही ग्रंथालय संगणकीकरणाच्या कामी अडचण येत असल्याचे नमुद केले आहे.

4) ग्रंथालय कमिटी सर्वच महाविद्यालयात आहेत. परंतु त्यातील किती कार्यक्षम ग्रंथालय कमिटी आहेत याचा विचार करावा लागतो. कारण ग्रंथालयातील व्यवस्थापनाच्या दृष्टिने असणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी या कमिटीने ग्रंथपाल, प्राचार्य यांना सहाय्य करावयाचे असते परंतु प्रत्यक्षात मात्र असे घडताना फारसे दिसत नाही. मुळात ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या बाबतीत आर्थिक तरतुद नसेल तर ग्रंथालय कमिटीने आग्रही भूमिका घेवून ती तरतुद करणे गरजेचे असते मात्र तसे होताना दिसत नाही.

5) ग्रंथालयाचा वाचक वर्ग विचारात घेवून त्या पद्धतीने ग्रंथालयीन सेवा पुरविली जाणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचक हा तसा वयाने मोठा व लगेचच नोकरी मिळविण्यासाठी सामोरा जाणारा असतो अशावेळी या वाचकांना मार्गदर्शक ठरेल, नोकरी मिळविण्याच्या कामी उपयोगी पडेल अशा गोष्टी ग्रंथालयामार्फत वाचकांना कशा पुरविल्या जातील याचा विचार करणे महत्वाचे

ठरते. यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे फार महत्वाचे असते. त्याच्या साहय्याने अधिक जलद सेवा आपण वाचकांना देवू शकतो.

6) ग्रंथालयाचे संगणकीकरण करताना प्रामुख्याने बाजारात विविध ग्रंथालय आज्ञावली उपलब्ध आहेत. त्यापैकी कोणत्यातरी एका ग्रंथालय आज्ञावलीची निवड करणे गरजेचे असते. बाजारात उपलब्ध अनेक आज्ञावली पैकी आपल्या वाचकांना सर्वाधिक सेवा देण्यासाठी कोणती आज्ञावली उपयुक्त आहे, इतर ग्रंथालयाच्या उपलब्ध सेवा मिळविण्यासाठी ती आज्ञावली सहाय्यभूत आहे की नाही याचा विचार करुन आज्ञावलीची निवड करावी लागते. मात्र रत्नागिरी जिल्ह्यात ज्या महाविद्यालयाने आज्ञावली घेतलेली आहे त्यांच्यात एकता दिसून येत नाही.

7) क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ खरेदी करताना सर्व विषयांना समान न्याय दिला गेला पाहिजे. अशा वेळी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असल्यास एका क्षणाधार्त विषयनिहाय ग्रंथाची यादी मिळवू शकतो ज्या विषयांना कमी ग्रंथ आहेत अशा विषयांना ग्रंथखरेदी मध्ये प्राधान्यक्रम देवून सर्व विषयांना समान न्याय देण्यासाठीही ग्रंथालयाचे संगणकीकरण उपयुक्त ठरते. मात्र या सर्वाचा गांभिर्याने विचार ग्रंथपालाने करावयास हवा.

8) ग्रंथालयातील नियतकालिके ही ग्रंथालयाचे अंदाजपत्रक विचारात घेवून खरेदी करावील लागत असल्याचे दिसते कारण आर्थिक तरतुद कमी पडत असल्याने ई नियतकालिके खरेदी करणे शक्य नसल्याचे काही महाविद्यालयीन ग्रंथपालांनी म्हटले आहे. त्यामुळे ई नियतकालिके देखील खूपच कमी महाविद्यालयातून दिसून येतात.

9) ग्रंथालयातील ईबुक्स च्या बाबतीतही आर्थिक प्रश्न, ग्रंथालयातील कमी उपलब्ध साधनसामुग्री व ईबुक्स वाचकांना उपलब्ध करुन देण्यासाठी लागणाऱ्या

साधनसामुग्रीचा अभाव यामुळे होणारी वाचकांची गैरसोय अशी कारणे ग्रंथपालांनी नोंदविली आहेत.

10) ऑडिओ, व्हिडीओ सीडीमध्ये देखील प्रचंड प्रमाणात ज्ञानभांडार उपलब्ध आहे. ग्रंथालयातील वाचक वर्ग व त्यांची गरज लक्षात घेवून त्याची उपलब्धता करुन घेणे हे ग्रंथपालाचे महत्वाचे काम आहे. त्यासाठी त्याला आर्थिक तरतुदीपासून सर्वच घटकांचा विचार करावा लागतो. रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये ही अपवादात्मक महाविद्यालये वगळता ऑडिओ, व्हिडीओची सोय ग्रंथालयामध्ये असल्याचे दिसत नाही.

11) ग्रंथालयाचे वर्गीकरण व तालिकीकरण करणे हे देखील ग्रंथालयातील महत्वाच्या कामापैकी एक महत्वाचे काम. परंतु रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांस महाविद्यालयीन ग्रंथालयांचे तालिकीकरण झालेले दिसत नाही. संगणकीकरणामुळे फक्त दोन महाविद्यालयात OPAC दिसून येते इतर महाविद्यालयातील संगणकीकरणाचे काम पूर्ण न झाल्याने ग्रंथालयातील सर्वच ग्रंथ OPAC वर उपलब्ध होत नाहीत. चार महाविद्यालये सोडली तर इतर महाविद्यालयात कार्ड कॅटलॉग देखील उपलब्ध नाही.

12) माहिती तंत्रज्ञानाच्या युगात चांगल्या रीतीने व तत्परतेने ग्रंथालयीन सेवा देता यावी यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण हे अतिशय क्लिष्ट काम आहे. आज विविध प्रकारच्या ग्रंथालयासाठी उपलब्ध संगणक प्रणाली बाजारात उपलब्ध आहेत. त्यापैकी योग्य त्या संगणक प्रणालीची ग्रंथालयासाठी निवड करणे, त्यासाठी आर्थिक तरतुद करणे, ग्रंथालयीन सेवकांसाठी योग्य ते प्रशिक्षण देण इत्यादी गोष्टीचा विचार या व्यवस्थापन विषयक समस्या रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयामध्येही दिसून येतात.

13) रत्नागिरी जिल्ह्यामधील महाविदयालयामध्ये स्वतंत्र ग्रंथालयासाठी इंटरनेट सुविधा फक्त दोनच महाविद्यालयात दिसून येत इतरत्र मात्र मुंबई विद्यापीठाने परीक्षेसाठी सक्तीची केल्याने इंटरनेट सुविधा महाविदयालयासाठी घेतलेली असून त्यातूनच कनेक्शन ग्रंथालयात दिलेले दिसून येते.

14) रत्नागिरी जिल्हयातील 6 महाविद्यालयीन ग्रंथालये Inflibnet शी जोडली गेलेली असून विद्यमान शैक्षणिक वर्षी आणखी दोन जोडली जातील.

15) रत्नागिरी जिल्ह्यातील 6 महाविद्यालयांनी Library Management System software खरेदी केलेले आहे. इतर महाविद्यालयांनी अजून खरेदी केलेले नसून ग्रंथालयाच्या उपलब्ध ग्रंथांच्या याद्या वगैरे EXCEL वर टाईप करुन ठेवलेल्या आहेत.

16) रत्नागिरी जिल्ह्यातील कोणत्याच महाविद्यालयीन ग्रंथालयाची स्वतंत्र बेवसाईट नाही.

अशा प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती दिसून येते.

## प्रकरण 6

# उपाययोजना व शिफारसी

# प्रकरण 6

# उपाययोजना व शिफारसी

रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरण संबंधित कोणकोणत्या समस्या आहेत हे समजावून घेतल्यानंतर संशोधकाने त्यासंदर्भात काही उपाययोजना येथे सुचविलेल्या आहेत.

1) ज्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या संगणकीकरणाची सुरुवात केलेली नसेल त्यांनी ती प्रक्रीया त्वरीत सुरु करावी व ज्यांची संगणकीकरणाची प्रकीया सुरु आहे त्यांनी ती त्वरीत पुर्ण करुन ग्रंथालयाचे संगणकीकरण पुर्ण करावे.

2) संगणकीकरणाच्या कामाला ग्रंथालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. यासाठी संस्था, प्राचार्य यांनी जी ग्रंथालयासाठी मंजूर पदे आहेत ती भरुन ग्रंथालयातच त्यांना कामाला लावावे. त्यांना अन्य विभागामध्ये स्थलांतरीत करु नये यामुळेही ग्रंथालयाच्या कामाला गती मिळेल.

3) ग्रंथालय कमिटी सर्वच महाविद्यालयात आहेत. परंतु त्यांनी कार्यक्षमपणे ग्रंथालयाच्या विकास कामामध्ये सहभाग घेवून ग्रंथपालाला ग्रंथालयाच्या विकासासाठी सहकार्य करावे. ग्रंथालयाच्या संगणकीकरणाच्या कामासाठी कराव्या लागणाऱ्या आर्थिक तरतुदीसाठी ग्रंथालय कमिटीने आग्रही भुमिका घेवून ग्रंथालयाचे संगणकीकरण करुन घ्यावे.

4) महाविद्यालयीन ग्रंथालयांनी विद्यार्थ्यांना नोकरीच्या दृष्टिने गरजेचे वाचनसाहित्य, नियतकालिके, वृत्तपत्रामधील कात्रणे इत्यादी माहिती सातत्याने विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर आणावी जेणे करुन विद्यार्थ्यांना ते भावी आयुष्यात नोकरी मिळविण्यासाठी उपयोगी पडेल. यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले असल्यास ही सेवा अधिक कार्यक्षमपणे ग्रंथालय देवू शकेल. यामुळे ग्रंथालयाच संगणकीकरण करणे महत्वाचे आहे.

5) ई-नियतकालिके, ई-बुक्स यासाठी भरीव आर्थिक तरतुद होणे गरजेचे आहे.

6) ऑडिओ, व्हिडीओ सीडीमध्ये देखील प्रचंड प्रमाणात ज्ञानभांडार उपलब्ध आहे. ग्रंथालयातील वाचक वर्ग व त्यांची गरज लक्षात घेवून अशा प्रकारच्या सीडी ग्रंथालयात ठेवणे व त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद होणे गरजेचे आहे.

7) ग्रंथालय तालिका हा ग्रंथालयाचा आरसा असतो. अशा वेळी ग्रंथालय तालिका अद्ययावत असावी व यासाठी सर्वच ग्रंथपाल यांनी काटेकोरपणे ती अद्ययावत ठेवावी. ज्या महाविद्यालयात ग्रंथालय तालिका नाही त्यांनी कार्ड तालिका सुरु करण्यापेक्षा ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचे काम त्वरीत पुर्ण करुन OPAC सुविधा त्वरीत सुरु करावी.

8) वाचकांना उत्तम दर्जाच्या सोई सुविधा देण्यासाठी ज्या महाविद्यालयांचे संगणकीकरण झालेले नाही त्यांनी संगणकीकरण करुन घ्यावे. ग्रंथालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे.

9) ग्रंथालयाचे संगणकीकरणासाठी आज्ञावली अजून ज्या महाविद्यालयांनी घेतलेली नाही त्यांनी ती आर्थिक तरतुद नसल्याचे कारण न सांगता सध्याच्या युगात गरजच असल्याचे सांगून त्वरीत घ्यावी जेणे करुन वाचक व सेवकांचा वेळ वाचेल, कार्यक्षम ग्रंथालय सेवा वाचकांना देता येईल.

10) N-list व्दारे वाचकांना ई बुक्स उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या ग्रंथालयांनी याचे सभासदत्व घेतलेले नाही त्यांनी ते त्वरीत घ्यावे.

अशा प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यस्थिती संदर्भात उपाययोजना करणे शक्य असले तरी यासर्वासाठी ग्रंथालयाचा विकास व्हावा ही आत्मीक तळमळ सर्वाच्या मनात असेल तरच हे शक्य होवू शकते.

# संदर्भसूची

## मराठी :-


०१ उपाध्याय जे. एल., २०१०, शैक्षिक पुस्तकालय संगठन एवं प्रबन्धन, नई दिल्ली, युनिवर्सिटी पब्लिकेशन.

02 कुमार सुनील, २००७, पुस्तकालय वर्गीकरण, नई दिल्ली, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस.

03 कुंभोजकर, ग, वि, 1989, संशोधन पध्दती व संख्या शास्त्र, कोल्हापूर , फडके प्रकाशन.पृ.19

04. गव्हाणे, अजय, वसंतराव, एप्रिल मे 1996, शिक्षण आणि ग्रंथालय एकाच नाण्याच्या दोन बाजू, ग्रंथपरीवार, पृ.12.

05. चितळे, चित्रलेखा म., १९९९, 'आधुनिक शैक्षणिक ग्रंथालयातील गुणवत्तेचे मापन', ज्ञानगंगोत्री, पृष्ठ १४-१६

06. जेधे, बाळासाहेब, ऑगस्ट सप्टेंबर 1999, शिक्षण हे ज्ञानाचे भांडार आहे, शिक्षण समिक्षा, पृ.16.

07. जोशी, अनंत आणि जोशी, वसंत, १९८०, ग्रंथालय संदर्भ सेवा, पुणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन.

08. नाडगोंडे, गुरुनाथ, 1986, सामाजिक संशोधन पध्दती, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

09 भांडारकर, पु, ल, 1987, सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ

10. मराठे, ना,बा, 1979, भारतीय ग्रंथालयांचा इतिहास, मुंबई, अभिनव प्रकाशन.पृ.6.

11 मुळ्ये, रा. शं. आणि उमाठे, वि. तु., १९७७, शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

12. रावते, शांताराम, जानेवारी 2007, सामान्य ज्ञानासाठी पदवीधरांचे अवांतरवाचन, भारतीय शिक्षण, पृ. 22-23.

13. रिसवाडकर, म, रा, 2000, संशोधन : व्याOEया आणि पध्दती, नाशिक, य. च. म.मु. विद्यापीठ, पृ.17-20 75

14. रंगनाथन, एस, आर, 1933, ग्रंथालय शास्त्राचा ओनामा, पुणे, इन्टरनॅशनल बुक सर्व्हिस,
15. **सिंह प्रमोद कुमार, २०१०, आधुनिक पुस्तकालय सूचना एवं प्रबन्धन, नई दिल्ली, युनिवर्सिटी पब्लिकेशन.**
16. **सिंह आर. के., सेंगर सुनीता, २००७, पुस्तकालय प्रबन्ध, नई दिल्ली, युनिवर्सिटी पब्लिकेशन**
17. संत, दु, का, 1889, संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग, आ.2 री., पुणे, विद्यार्थी गृह . प्रकाशन.
18. हिंदप, मृ.सं., जून 1998, शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयाचे योगदान, भारतीय शिक्षण, पृ. 222.

**English -**

19. American Library Association(1983) A.L.A. Glossary of Library & Information Science.Chicago.
20. Aggrawal, B.C., 2005, Collection Development & Collection Management, Jaipur, ABD, Pp. 124-138.
21. Busha, Charles H and Stephen P Harter, 1980, Research Methods in Lbrarianship : Techniques and Interpretation, New York, Academic Press, p. 3.
22. Gopal, M. H. 1970, A Introduction to Research Procedure in social science, Bombay, Asis Publication House.
23. Halder Sambhu Nath, Jana Sibsankar, 2013, Library And Information Science in Changing Paradigm, New Delhi, Ess Ess Publication.
24. Hillway, Tyrus, 1964, Introduction to Research, Boston, Houghton Mifflin Co, p.148-157.
25. Kemp, D. Alasdair, 1979, Current Awareness Services, London, Clive Bingley, p.106.
26. Kothari, C. R., Research Methodology methods & tecniques, New 76

Delhi, New age international (p) Ltd. p.152.

27. National Policy on Library & Information system - A presentation, Mnistory of Himan Resource Development, Dept of Culture, New Delhi, 1986.
28. New Encyclopedia Britanica, 1977, Chicago, Encyclopedia Britannica, INC, Vol.10, p.862.
29. Oxford English Dictionary, 1989, Oxford Clarendon press, Vol. 3, p.888.
30. Prakash, Chander 1996, New Technologies and Development in Library and Information Science, Jaipur, Mangal Deep publication.
31. Sharma, K. K. , Pathank, G., Mangnale , V. S., and etc., 2004, Intellectual's Sandharbh Maharashtra, Bhopal, Intellectual Books Bureas, Pp. 314-338.
32. Singh R. K., Sengar Sunita , 2007, Library Collection Development and Acquisition System, New Delhi, Shree Publication & Distributors.
33. Subramayanya, G, Methods and techniques of social research, Bangalore, Sapana book house, p.82-88.
34. Suresh Lata, 2011, Library Professionals, Jaipur, Shruti Publications.
35. Tejomurty, A. 1987 संशो, Studies in Academic Librariship, Jaipur, Printwell Publishers.
36. Trehan, G. L., 1985, College Library Management, New Delhi, Sterling, P. 78.
37. Whitney, Frederic Lamson., 1948, The Elements of Research, New York, Prentice-Hall.

## Webside

38. http// www.maharashtra.gov.in/

# परीशिष्ट

# परीशिष्ट 1 - प्रश्नावली

श्री. दगडू अर्जुन जगताप
ग्रंथपाल,
मंडणगड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
मंडणगड, जि. रत्नागिरी - ४१५ २०३

दिनांक :

प्रति,
मा. प्राचार्य / ग्रंथपाल ,
.....................................
.....................................

विषय : विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत लघु संशोधन प्रकल्प प्रश्नावली भरुन देणेबाबत...

महोदय,

मी श्री. दगडू अर्जुन जगताप, मंडणगड कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या ठिकाणी ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहे. मला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ''रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्यःस्थिती'' या विषयावरील लघु संशोधन प्रकल्प मंजूर झालेला असून त्याच्या अभ्यासासाठी मला विशिष्ट नमुन्यात आपणाकडून आपल्या ग्रंथालयविषयक माहितीची गरज आहे. त्याकरीता प्रश्नावली तयार केलेली आहे.

सदर लघु संशोधन प्रकल्पासाठी जी माहिती आपणाकडून मिळेल त्यावर माझे संशोधन कार्य अवलंबून आहे. मला आवश्यक असलेली माहिती सोबत जोडलेल्या प्रश्नावलीव्दारे मी मिळवीत आहे, तरी ती आपण भरुन द्यावी ही विनंती. सदरची माहिती ही संशोधनासाठीच वापरली जाईल. तिचा कसलाही दुरुपयोग केला जाणार नाही, ती गुप्त ठेवली जाईल याची मी हमी देतो. तरी सदर प्रश्नावली भरुन देऊन आपण माझ्या लघु संशोधन प्रकल्पाकरीता सहकार्य करावे ही पुनश्च विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

( श्री. दगडू अर्जून जगताप )

सोबत : प्रश्नावली. ग्रंथपाल

विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत लघु संशोधन प्रकल्प प्रश्नावली

## रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालय संगणकीकरणाची सद्य:स्थिती

(अ) सर्वसाधारण माहिती :-

१) महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ______________________

______________________

२) पालक संस्थेचे नाव व पत्ता : ______________________

______________________

३) दुरध्वनी कमांक : ______________________

४) फॅक्स कमांक : ______________________

५) ई-मेल पत्ता : ______________________

६) महाविद्यालय वेबसाईट पत्ता : ______________________

७) महाविद्यालय स्थापना वर्ष : ______________________

८) महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासकम :-
(चौकरात (√) अशी खून करावी)

अ) पदवी अभ्यासकम : कला ☐ वाणिज्य ☐ विज्ञान ☐

ब) पदव्युत्तर अभ्यासकम : कला ☐ वाणिज्य ☐ विज्ञान ☐

९) महाविद्यालय २(f) व १२ (B) अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानास पात्र आहे काय ? आहे ☐ नाही ☐

१०) महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन झाले आहे काय ? आहे ☐ नाही ☐

अ) असल्यास मिळालेली ग्रेड :...................

ब) नॅक मूल्यांकन केल्याचे वर्ष :...................

क) नॅक पूर्नमूल्यांकन मिळालेली ग्रेड :...................

ड) नॅक पूर्नमूल्यांकन केल्याचे वर्ष :...................

(ब) ग्रंथालयाबाबत माहिती :-

१) ग्रंथालयाचे नाव : ______________________

______________________

२) दुरध्वनी कमांक : __________ फॅक्स : __________

३) ई-मेल पत्ता : ______________________

४) ग्रंथालय वेबसाईट पत्ता : ______________________

५) ग्रंथालयात असलेले विभाग/कक्ष :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | वाचन कक्ष (अभ्यासिका) | : | आहे ☐ | नाही ☐ |
| २) | संदर्भ विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ३) | ग्रंथसंस्करण विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ४) | नियतकालिके विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ५) | ग्रंथसंग्रह विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ६) | देवघेव विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ७) | झेरॉक्स विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ८) | इंटरनेट कक्ष | : | आहे ☐ | नाही ☐ |
| ९) | ऑडिओ-व्हिडीओ विभाग | : | आहे ☐ | नाही ☐ |

६) ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा याकरीता पुरेसे आहे का ? आहे ☐ नाही ☐

७) ग्रंथसंग्रह :-

१) संदर्भ ग्रंथ संख्या : ______

२) कमिक ग्रंथ संख्या : ______

३) सी.डी./डी.व्ही.डी. : ______

४) ईबुक्स : ______

८) नियतकालिके संख्या :

१) राष्ट्रीय : २) आंतरराष्ट्रीय :

९) दैनिके :

| अ.क्रं | भाषा | एकूण |
|---|---|---|
| १ | मराठी | |
| २ | हिंदी | |
| ३ | इंग्रजी | |
| | एकूण | |

१०) ग्रंथालय वेळ :

अ) दररोजची वेळ सकाळी __________ ते सांयकाळी __________.

ब) परीक्षेच्या वेळ सकाळी __________ ते सांयकाळी __________.

क) सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय सुरु असते का ? आहे ☐ नाही ☐

११) ग्रंथालय वाचक :

अ) शिक्षक :

ब) शिक्षकेतर कर्मचारी :

क) विद्यार्थी :

ड) माजी विद्यार्थी :

इ) संस्था पदाधिकारी :

१२) ग्रंथालय कर्मचारी :

| अ.क्रं | कर्मचारी पद | संख्या |
|---|---|---|
| १ | ग्रंथपाल | |
| २ | सहायक ग्रंथपाल | |
| ३ | लिपीक | |
| ४ | ग्रंथालय परिचर | |
| ५ | सेवक | |
| | एकूण | |

१३) ग्रंथालय समिती आहे का ? आहे ☐ नाही ☐

१४) असल्यास समितीच्या वर्षातून किती बैठका होतात ? : __________

१५) ग्रंथालयाचे वर्गीकरण केले आहे काय ? आहे ☐ नाही ☐

१६) असल्यास कोणत्या पध्दतीने वर्गीकरण करता ? : ..................................

१७) ग्रंथालयाचे तालिकीकरण अद्यायवत केले आहे काय ? आहे ☐ नाही ☐

१८) ग्रंथालयात संगणक आहे का ? आहे ☐ नाही ☐

१९) असल्यास संगणकाची संख्या ☐

२०) संगणक ग्रंथालयात न घेण्यामागचे कारण :

अ) संगणक साक्षर कर्मचारी नाहीत ☐

ब) आर्थिक समस्या ☐

संगणक असल्यास :

२१) ग्रंथालयाचे संगणकीकरण केले आहे का ? आहे ☐ नाही ☐

असल्यास :

अ) संगणकीकरण पूर्ण झाले आहे का ? ☐

ब) संगणकीकरणाचे काम का चालू आहे ? ☐

२२) संगणक प्रणाली नेटवर्कसी जोडलेली आहे काय ? आहे ☐ नाही ☐

२३) संगणक प्रणालीस ऑनलाईन मदत आहे काय ? आहे ☐ नाही ☐

२४) संगणक प्रणालीत OPAC ची सोय आहे काय ? आहे ☐ नाही ☐

२५) असल्यास खालीलपैकी कोणते शोध पर्याय उपलब्ध आहेत ?

अ. लेखकनाम ☐ ब. ग्रंथनाम ☐

क. विषयनाम ☐ ड. वर्गांक ☐

इ. ठीकाण ☐ ई. प्रकाशन ☐

उ. मालिका ☐ ऊ. बुलीयन सर्च ☐

२६) खालीलपैकी कोणकोणत्या बाबींचे ग्रंथालय संगणकीकरण करण्यात आले आहे ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | देवघेव | ☐ | २. | तालिकीकरण | ☐ |
| ३. | अंदाजपत्रक | ☐ | ४. | ग्रंथनोंद | ☐ |
| ५. | बारकोडींग | ☐ | ६. | ग्रंथ पडताळणी | ☐ |

२७) खालीलपैकी कोणकोणती संगणकीय उपकरणे ग्रंथालयात उपलब्ध आहेत ?

| अ.क्रं. | उपकरण | नग |
|---|---|---|
| १. | सर्व्हर | _____ |
| २. | संगणक | _____ |
| ३. | प्रींटर | _____ |
| ४. | बारकोड प्रींटर | _____ |
| ५. | स्कॅनर | _____ |
| ६. | बारकोड स्कॅनर | _____ |
| ७. | एल.सी.डी. प्रोजेक्टर | _____ |
| ८. | यु.पी.एस. | _____ |
| ९. | बॅकअप | _____ |

२८) खालीलपैकी कोणकोणत्या संगणक प्रणाली उपलब्ध आहेत ?

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नेटवर्क ऑपरेटींग सीस्टीम | आहे ☐ | नाही ☐ |
| २) | लायब्ररी मॅनेजमेंट सीस्टीम | आहे ☐ | नाही ☐ |
| ३) | डीजीटल लायब्ररी सॉफ्टवेअर | आहे ☐ | नाही ☐ |
| ४) | नेट मॅनेजमेंट सॉफ्टवेअर | आहे ☐ | नाही ☐ |
| ५) | ॲंटीव्हायरस सॉफ्टवेअर | आहे ☐ | नाही ☐ |

२९) ग्रंथालयामध्ये स्वतंत्र इंटरनेट कनेक्शन आहे काय ? आहे ☐ नाही ☐

३०) ग्रंथालयामध्ये खालीलपैकी कोणत्या प्रकारचे नेटवर्क आहे ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | लॅन (LAN) | ☐ | २. | वॅन (WAN) | ☐ |
| ३. | मॅन (MAN) | ☐ | ४. | इंट्रानेट(INTRANET) | ☐ |
| ५. | इक्स्ट्रानेट (EXTRANET) | ☐ | ६. | वायरलेस(Wireles) | ☐ |

३१) ग्रंथालयामध्ये कोणकोणती नेट ब्राऊझर्स उपलब्ध आहेत ?

१. नेटस्केप २. इंटरनेट एक्सफ्लोर

३. मोझॅला ४. ओपेरा

५. लिनेक्स

३२) ग्रंथालयामध्ये ईमेल सुविधा उपलब्ध आहे काय ? आहे ☐ नाही ☐

३३) ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण झाले असल्यास आपण वाचकांना संगणकामार्फत कोणकोणत्या प्रकारच्या सेवा पुरवता ?

१) ______________________________

२) ______________________________

३) ______________________________

४) ______________________________

५) ______________________________

६) ______________________________

७) ______________________________

८) ______________________________

९) ______________________________

३४) आपले ग्रंथालय **Inflibnet** सी कनेक्ट आहे काय ? आहे ☐ नाही ☐

३५) भविष्यातील नियोजन :

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

ठिकाण : सील ग्रंथपाल सही

दिनांक :

# परीशिष्ट 2

## रत्नागिरी जिल्ह्यातील अनुदानित कला, वाणिज्म व विज्ञान महाविद्यालयांची सूची

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| 1 | आबासाहेब मराठे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | राजापूर |
| 2 | आय.सी.एस. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | खेड |
| 3 | कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | पाटपन्हाळे |
| 4 | कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | लांजा |
| 5 | ग.बा. तथा तात्यासाहेब खरे वाणिज्य, पार्वतीबाई गुरुपद ढेरे कला आणि विज्ञान महाविद्यालय | गुहागर |
| 6 | गोगटे- जोगळेकर महाविद्यालय | रत्नागिरी |
| 7 | डि.बी.जे महाविद्यालय | चिपळूण |
| 8 | तात्यासाहेब नातू कला व वाणिज्य महाविद्यालय | मार्गताम्हणे |
| 9 | दापोली अर्बन बॅक सिनियर सायन्स महाविद्यालय | दापोली |
| 10 | मनोहर हरी OEापणे कला व वाणिज्य महाविद्यालय | पाचल |
| 11 | मंडणगड कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | मंडणगड |
| 12 | वराडकर- बेलोसे महाविद्यालय | दापोली |

परीशिष्ट 3

## रत्नागिरी जिल्हा स्थानदर्शक नकाशा

